पाहिजेत

हॉटेल साई इन, चोंढी-अलिबाग रोड येथे फुल टाईम/पार्ट टाईम रिसेप्शन स्टाफ/अकाऊंट पाहिजे (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक अर्जासह भेटा.

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | गुरुवार | दि. १९ नोव्हेंबर २०२६ | अंक १६३ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in



अलिबागमधील 27 अंगणवाड्या होणार 'स्मार्ट'

शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

ग्रामीण आणि आदिवासी भागातील बालकांनाही आधुनिक, दर्जेदार आणि आनंददायी पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. अलिबाग तालुक्यातील २७ अंगणवाडी केंद्रांचे आदर्श स्मार्ट अंगणवाडी केंद्रांमध्ये रूपांतर करण्याच्या दृष्टीने शासनाने सकारात्मक निर्णय घेतला असून, प्रत्येक केंद्रासाठी १ लाख ६५ हजार रुपयांच्या मर्यादेत स्मार्ट अंगणवाडी किट खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे तालुक्यातील अंगणवाड्यांचे आधुनिकीकरण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्रांमधून बालकांना आरोग्य सेवा, पूरक पोषण आहार आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या सुविधा पुरविल्या जातात. मात्र, बदलत्या काळानुसार या सुविधांचा दर्जा उंचावणे आणि ग्रामीण भागातील बालकांनाही शहरी भागातील मुलांप्रमाणे आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेऊन जयंत पाटील यांनी अलिबाग तालुक्यातील २७ अंगणवाड्यांचे स्मार्ट अंगणवाड्यांमध्ये रूपांतर करण्याची मागणी शासनदरबारी तसेच विधिमंडळाच्या सभागृहात सातत्याने लावून धरली होती. अंगणवाडी हे केवळ पोषण आहार वाटपाचे केंद्र नसून बालकांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाचा पाया घडविणारे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. बालकांचे वय, क्षमता आणि आकलनशक्ती लक्षात घेऊन त्यांना खेळातून शिक्षण, विविध शैक्षणिक साहित्य आणि पोषक वातावरण मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर महिला आणि किशोरवयीन मुलींसाठी पोषण, आरोग्य आणि कौशल्यविकासाच्या उपक्रमांमध्येही अंगणवाडी केंद्रांची भूमिका महत्त्वाची आहे. याच व्यापक दृष्टिकोनातून •➤पान २ वर

या अंगणवाड्यांचा समावेश

अलिबाग तालुक्यातील सागवाडी, वावे, तळवली, रेवदंडा, कोळगाव, शिरवली, झालखंड, खिडकी, घसवड, खुटळवाडी, वाघोली आदिवासीवाडी, बारशेत, वाढगाव आदिवासीवाडी, नवेनगर, सुतारपाडा, कावीर, खैरवाडी, फोफेरी, चिंचवली, देहेन, रांजणखार, बोपोली, डांगी, कोळघर, मुळे, थळ, अंदोशी आणि घोटवडे येथील अंगणवाड्यांचा या उपक्रमात समावेश आहे.

१.६५ लाखांचे मिळणार किट

शासनाच्या मान्यतेनुसार प्रत्येक अंगणवाडी केंद्राला १ लाख ६५ हजार रुपयांच्या मर्यादेत स्मार्ट अंगणवाडी किट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या माध्यमातून अंगणवाड्यांमधील शैक्षणिक साहित्य आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होण्यास मदत होणार आहे.



जलजीवन योजनेत त्रुटी
पालकमंत्र्यांची कबुली



। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

रायगडच्या जनतेला घराघरात पाणी पोहोचवण्याच्या गाजावाजा करणाऱ्या जलजीवन मिशनचा कारभार आता चव्हाट्यावर आला आहे. रखडलेली कामे, निकृष्ट पाइपलाईन, अपुऱ्यापाण्याच्याटाक्या आणि चुकीच्या सर्व्हेमुळे योजनांचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, पुण्यातील संस्थेने केलेला सर्व्हे चुकीचा असल्याची कबुली खुद्द पालकमंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केली. त्यामुळे जलजीवनच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पाणीपुरवठ्याच्या नियोजनातील त्रुटी कधी दूर होणार, असा सवाल उपस्थित होत आहे. त्यातच आढावा बैठकीवर राष्ट्रवादी काँग्रेसने बहिष्कार टाकल्याने प्रशासकीय त्रुटींसोबत राजकीय वादही समोर आला आहे. एकीकडे पाण्याचा प्रश्न गंभीर होत असताना दुसरीकडे बहिष्कार आणि प्रोटोकॉलवरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. त्यामुळे रायगडकरांच्या नशिबी पाणी की केवळ आश्वासनांचा पाऊस, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जलजीवनच्या योजना रखडल्या याची कल्पना आहे. तसेच, जलजीवन योजनांमध्ये अनेक त्रुटी आणि चुका आहेत. पुण्याच्या एका संस्थेने या योजनेचा सर्व्हे केला. परंतु, हा सर्व्हे चुकीचा झाला असल्याची खंत पालकमंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केली. त्यामुळे आगामी काळात पाण्याचा प्रश्न गंभीर निर्माण होऊ नये, यासाठी प्रयत्न करून या योजना पुर्णत्वास नेण्याचा प्रयत्न करा, अशी सुचना गोगावले यांनी अधिकाऱ्यांना दिली. •➤पान २ वर

राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांचा बहिष्कार

पालकमंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात जलजीवन मिशन योजनेच्या कामांचा आढावा बैठक बुधवारी घेण्यात आली. या बैठकीत महायूतीमधील अजित पवार गटातील राष्ट्रवादीचे पदाधिकारी व सदस्यांनी बहिष्कार टाकल्याची चर्चा जिल्हा परिषदेमध्ये सुरु आहे. बहिष्कार टाकण्याचे कारण स्पष्ट झाले नाही; परंतु, राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांच्या गैरहजेरीने वेगवेगळ्या चर्चेला उत आला आहे.

> पनवेल येथे झालेल्या जिल्हा परिषदेच्या बैठकीमध्ये जलजीवनची स्वतंत्र बैठक दि.१३ नोव्हेंबर रोजी घेण्याचे ठरले होते; मात्र, ही बैठक पालकमंत्री यांच्या उपस्थितीत होणार, हे ठरले नव्हते. जर पालकमंत्री जलजीवनच्या बैठकीत होते, तर राष्ट्रवादी पक्षाच्या मंत्र्यांना देखील आमंत्रण द्यायला हवे होते. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व सदस्य आणि सभापती या बैठकीला उपस्थित नव्हते.
>
> **– अमित नाईक,** गटनेता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष

प्रोटोकॉल न पाळण्याचा आरोप

जलजीवन योजनेच्या आढावा बैठक ही जिल्हा परिषद पदाधिकारी, सदस्य आणि ठेकेदारांसमवेत घेण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी अध्यक्षांकडे केली होती. परंतु, जिल्हा परिषद अध्यक्षांनी त्या मागणीची दखल न घेता पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक का घेतली, याबाबत उलगडा झाला नाही. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होत असताना जिल्ह्यातील मंत्री, आमदार व इतर लोकप्रतिनिधींनाही बोलावणे गरजेचे होते. त्या नियमांचे पालन करण्यात आले नाही. या बैठकीत ज्यांचा काहीही संबंध नाही, ते व्यासपिठावर होते. त्यामुळे या बैठकीत प्रोटोकॉल पाळण्यात आला नाही, असा आरोप जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी केला आहे. त्यामुळे या बैठकीत उपस्थित राहिलो नसल्याचे त्यांनी सांगितले.

ना नल, ना जल

■ **४६ हजार कुटूंबांना वैयक्तीक नळ जोडणीची प्रतिक्षा**

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

प्रति माणसी, प्रति दिन ५५ लीटर पाणी देण्याचे अमिष दाखवून रायगड जिल्ह्यात जलजीवन योजना राबविण्यात आली. मात्र, जिल्ह्यातील ४६ हजार कूटूंबिय आजही वैयक्तीक नळ जोडणीपासून वंचित असल्याचे समोर आले आहे. या हजारो कुटूंबामध्ये जलजीवनचे पाणीच पोहचले नसल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार दिसून आली आहे.

शाश्वत पाणी पुरवठ्याबरोबरच पाण्याची बचत, पाण्याचा काटकसरीने वापर, पाण्याची गुणवत्ता अबाधित राखण्यासाठी जलजीवन योजना सुरु करण्यात आली. जिल्ह्यामध्ये ८०९ ग्रामपंचायती असून १ हजार ८३० महसूली गावे आणि ५ हजार ३ पेक्षा अधिक गावे व वाड्यांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यामध्ये केंद्र सरकार पूरस्कृत जलजीवन मिशन योजना रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत राबविण्यात आली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील सर्व कुटूंबाना 'हर घर नल से जल' या प्रमाणे पाणी पुरवठा करणे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तीक नळ जोडणीद्वारे किमान प्रति दिवस ५५ लीटर गुणवत्तापूर्ण पाणी पुरवठा करणे, हे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता समिती व शासनामार्फत मंजूरी प्राप्त १ हजार ५९२ योजनांच्या २०२२-२४ वर्षाचा कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात आल्या. त्यापैकी आजपर्यंत ९३६ योजना भौतिकदृष्ट्या पुर्ण असून, त्यापैकी २६२ योजना आर्थिक दृष्ट्या पुर्ण करण्यात आल्या आहेत. उर्वरित योजना प्रगती पथावर असल्याची •➤पान २ वर

पाच वर्षांचा नियम कागदावर; ३४ कर्मचारी एकाच खुर्चीवर!

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषदेत प्रशासकीय बदल्यांच्या नियमांची अंमलबजावणी होते की त्यांना सोयीस्करपणे बगल दिली जाते, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. एकाच विभागात पाच वर्षांपेक्षा अधिक काळ कार्यरत असलेल्या वरिष्ठ सहाय्यकांच्या अंतर्गत बदल्यांबाबत शासनाच्या तरतुदी असताना तब्बल ३४ कर्मचारी २०१९ पासून एकाच विभागात कार्यरत असल्याची माहिती माहितीच्या अधिकारातून समोर आली आहे. त्यात दोन कर्मचारी २०१५ पासून म्हणजेच तब्बल ११ वर्षांपासून एकाच विभागात कायम असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे पाच वर्षांच्या बदली नियमांचे नेमके झाले काय, असा सवाल उपस्थित होत असून, जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



- **आरटीआयमधून धक्कादायक माहिती झाली उघड**
- **दोन कर्मचाऱ्यांचा ११ वर्षांपासून एकाच विभागात मुक्काम**
- **जिल्हा परिषद प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह!**

रायगड जिल्हा परिषदेतील वरिष्ठ सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत विभागीय बदल्यांबाबत संजय गंगाराम सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागवली होती. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने त्यांनी कर्मचाऱ्यांच्या विभागीय बदल्या, बदली आदेश, रुजू अहवाल तसेच पाच वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची सविस्तर माहिती मागितली होती. प्राप्त माहितीनुसार, जिल्हा परिषदेत वरिष्ठ सहाय्यक संवर्गातील तब्बल ३४ कर्मचारी २०१९ पासून एकाच विभागात कार्यरत आहेत. विशेष म्हणजे, यातील दोन कर्मचाऱ्यांचा एकाच विभागातील कार्यकाळ २०१५ पासून सुरू असल्याचे समोर आले आहे. तब्बल ११ वर्षे एकाच विभागात कार्यरत राहण्यामागील प्रशासकीय कारणे काय, असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी उपस्थित केला आहे. •➤पान २ वर

दिवेआगारचे सरपंच अडचणीत

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर ग्रामपंचायत सरपंचांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. निवडणुकीच्या अर्जासोबत दाखल केलेल्या शपथपत्रातस्वतः च्या मालमत्तेची माहिती लपवल्याप्रकरणी दिवेआगरचे विद्यमान सरपंच विजय तोडणकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश श्रीवर्धनचे महसूल नायब तहसीलदार यांनी दिले आहेत. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दिवेआगर ग्रामपंचायतीची पोटनिवडणूक एप्रिलमध्ये पार पडली असून, या निवडणुकीत विजय तोडणकर हे थेट जनतेतून सरपंचपदावर निवडून आले आहेत. दरम्यान, त्यांनी उमेदवारी अर्ज भरताना जोडलेल्या •➤पान २ वर



रायगडच्या हापूसची एन्ट्री

■ **डॉ. संदेश पाटील यांना मिळाला पहिला मान**

■ **वाशी मार्केटमध्ये ९ पेट्या दाखल**

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

कोकणचा राजा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हापूस आंब्याच्या हंगामाची यंदा नोव्हेंबर महिन्यातच चाहूल लागली असून, रायगडच्या हापूस आंब्याने थेट मुंबईच्या बाजारपेठेत दमदार एन्ट्री केली आहे. अलिबाग तालुक्यातील जांभूळपाडा येथील आंबा बागायतदार डॉ. संदेश पाटील यांच्या बागेतील हापूस आंब्याच्या तब्बल ९ पेट्या वाशी येथील घाऊक आंबा मार्केटमध्ये विक्रीसाठी रवाना करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, रायगड जिल्ह्यातून मुंबईच्या बाजारपेठेत यंदाचा पहिला हापूस आंबा पाठविण्याचा मान डॉ. संदेश पाटील यांना मिळाला आहे. प्रत्येक पेटीत दोन डझन आंब्यांचा समावेश असून, या पहिल्याच आवकेमुळे रायगडच्या आंबा बागायतदारांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांतील हापूस आंब्याची देशभरात वेगळी ओळख आहे. मात्र, रायगड जिल्ह्यातही उत्तम दर्जाचा, चवदार आणि गुणवत्तापूर्ण हापूस आंबा उत्पादित होत असून, रायगडचा हापूस कोणत्याही बाबतीत मागे नाही, असा ठाम विश्वास डॉ. संदेश पाटील •➤पान २ वर

जुन्या टाकीच्या जागी नवे नियोजन | **प्रशांत नाईक यांच्याकडून जागेची पाहणी**

अलिबागच्या विकासाला जलशक्तीची जोड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

शहराचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि नव्या प्रकल्पांच्या उभारणीने होत नसतो, तर त्या शहरातील नागरिकांना मिळणाऱ्या मूलभूत सुविधांच्या दर्जावरही विकासाचे खरे मोजमाप ठरते. त्यामध्ये पाणीपुरवठा ही सर्वाधिक महत्त्वाची सुविधा असून, ती शहराच्या विकासाची जीवनवाहिनी आहे. हाच दृष्टिकोन समोर ठेवून अलिबाग शहराच्या पाणी साठवण क्षमतेत वाढ करण्याच्या दृष्टीने रामनाथ मराठी शाळेजवळ ५ लाख लिटर क्षमतेची नवीन पाण्याची टाकी उभारण्यात येणार आहे. या प्रस्तावित कामाच्या जागेची अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी पाहणी केली.



अलिबाग शहराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. वाढते शहरीकरण, नवीन बांधकामे, पर्यटन क्षेत्राचा विस्तार आणि नागरिकांच्या वाढत्या गरजा यामुळे पायाभूत सुविधांवर ताण निर्माण होणे स्वाभाविक आहे. अशा परिस्थितीत केवळ सध्याची गरज भागविण्यापुरते नियोजन न करता आगामी काळातील लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेऊन सुविधांचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे. पाण्याची उपलब्धता, साठवण •➤पान २ वर

अलिबाग नगरपरिषदेचे महत्त्वपूर्ण पाऊल

सध्या नियोजित ठिकाणी असलेल्या ३ लाख लिटर क्षमतेच्या जुनी टाकीला पर्याय म्हणून ५ लाख लिटर क्षमतेची नवीन टाकी उभारण्यात येणार आहे. या कामासाठी नगरोत्थान योजनेतून निधी उपलब्ध झाला असून, नवीन टाकीच्या बांधकामासाठी १ कोटी ५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नवीन टाकीची क्षमता २ लाख लिटरने अधिक असल्यामुळे पाणी साठवण क्षमतेत सुमारे ६६.६७ टक्क्यांनी वाढ होणार आहे. नवीन पाण्याची टाकी हा केवळ जुन्या बांधकामाला पर्याय नसून, बदलत्या अलिबागच्या वाढत्या गरजांशी पाणीपुरवठा व्यवस्थेची सांगड घालण्याचा प्रयत्न आहे. शहराचा विकास कितीही वेगाने झाला, तरी प्रत्येक घरापर्यंत पुरेसे पाणी पोहोचणे हीच त्या विकासाची खरी कसोटी आहे. त्यामुळे अलिबागच्या भविष्यातील नागरी विकासाला जलशक्तीची जोड देण्याच्या दिशेने अलिबाग नगरपरिषदेचे हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



सिमेंट काँक्रीटच्या कामांना ब्रेक?

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

यावर्षी दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाण्याचा मोठ्या प्रमाणात होणारा वापर टाळण्यासाठी शासनाने महत्वपूर्ण भूमिका घेतली आहे. काँक्रीट रस्ते, सांडपाणी निचरा करण्यासाठी गटारे इत्यादी कामांसाठी प्रशासकीय मान्यता देऊ नये, असे आदेश दि.५ नोव्हेंबरला काढले होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाण्याचा काटकसरीने वापर आणि बचत करण्याच्या उद्देशाने सिमेंट काँक्रिटऐवजी डांबरी रस्त्यांना प्राधान्य देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील संभाव्य पाणीटंचाईचे संकट लक्षात घेऊन हा धोरणात्मक बदल करण्यात आला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यामुळे सिमेंट काँक्रीटच्या कामांना ब्रेक लागण्याची शक्यता आहे.

राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत विविध कामांच्या योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी दि.३० नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. जलसंधारणाची कामे, नाला खोलीकरण, जलयुक्त शिवार, जलस्रोत बंधाऱ्यांचे बळकटीकरण इत्यादी कामांना व योजनांचा समावेश आहे. ज्या कामांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर होतो, अशा काँक्रीट रस्ते, गटार इत्यादी कामांना वाढीव कालावधीत प्रशासकीय मान्यता देऊ नये, असे आदेश काढले होते. दि.५ नोव्हेंबरला हे परिपत्रक काढले होते. त्यानंतर राज्याच्या मंत्री मंडळाच्या बैठकीत डांबरी रस्त्यांना प्राधान्यावर भर देण्यात आला आहे. यापुढे राज्यातील रस्ते बांधकामामध्ये सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यांऐवजी डांबरी रस्ते तयार करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. सिमेंट काँक्रिटचे रस्ते तयार करण्यासाठी आणि त्यांच्या क्युरिंगसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवश्यकता असते. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नवीन बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करण्यावरही राज्य सरकारने बंदी घातली आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त परिस्थितीत सिमेंट काँक्रीटच्या कामांना ब्रेक लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

पान १ वरुन

अलिबागमधील २७ अंगणवाड्या होणार 'स्मार्ट'

जयंत पाटील यांनी अंगणवाड्यांच्या आधुनिकीकरणाचा विषय विधिमंडळात सातत्याने उपस्थित केला होता. ग्रामीण आणि आदिवासी भागातील बालकांना सुविधांपासून वंचित राहावे लागू नये, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी आणि अंगणवाडी सेवांचा दर्जा सुधारावा, यासाठी त्यांनी शासनाकडे आग्रही भूमिका मांडली. या निर्णयामुळे अलिबाग तालुक्यातील २७ अंगणवाड्यांच्या आधुनिकीकरणाला चालना मिळणार आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील बालकांना आधुनिक शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल ठरणार असून, जयंत पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे हे फलित मानले जात आहे.

पालकमंत्र्यांची कबुली

जलजीवन मिशन योजनाबाबत अलिबागमधील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पालकमंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.१८) आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी सभापती वैकुंठ पाटील, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले आदींसह ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मोहन सरवदे, जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अभियंता, जिल्हा परिषद सदस्य उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री भरत गोगावले यांनी तालुका स्तरावर जिल्ह्यातील जलजीवन योजनेच्या कामांचा आढावा घेतला. रखडलेल्या योजनांची माहिती घेऊन तात्काळ काम करण्याची सुचना अधिकाऱ्यांना दिली. वीस वर्षे डोळ्यासमोर ठेवून योजना राबविल्या जातात. त्यानुसार पाण्याच्या टाकीची क्षमता असणे आवश्यक आहे. मात्र, त्या पद्धतीने काम होत नसल्याने योजना अडचणीत आल्या आहेत. येणारा काळ पाण्यासाठी फार कठीण आहे. जलजीवन योजनेसाठी असणारी पाईप लाईन न टीकणारी आहे. साठवून ठेवलेला पाईपचा साठा आगीने जळून गेला आहे. ज्या पद्धतीने पाण्याच्या टाकीची बांधणी हवी, तशी दिसत नाही, अशा अनेक तक्रारी आहेत. या योजनेत अनेक त्रुटी आणि चुका आहेत. या चुकांसह त्रुटी दूर करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. यावर्षी पाऊस २२ दिवस उशिरा पडला आणि सप्टेंबरपासून पाऊस गायब झाला. त्यामुळे पाण्याचा दुष्काळ वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्यात यावी, अशी सुचना भरत गोगावले यांनी दिली.

ना नल, ना जल

माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली. जिल्ह्यामध्ये ५ लाख ४८ हजार ६२० इतकी कुंटूबे असून, ५ लाख १ हजार ९७३ कुटूंबांना वैयक्तीक नळ कनेक्शन देण्यात आले असल्याची माहिती जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे. मात्र, उर्वरित ४६ हजार ६४४ कुटूंबे अजूनही वैयक्तीक नळ जोडणीपासून वंचित असल्याची माहिती आकडेवारीनुसार समोर आली आहे. या नळ जोडणीचे काम प्रगती पथावर असल्याचे कारण देण्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो कुटूंबीय जलजीवन योजनेपासून वंचित असल्याचे उघड झाले आहे.

अलिबागच्या विकासाला जलशक्तीची जोड

आणि वितरण व्यवस्था सक्षम असेल, तरच शहराचा विकास अधिक शाश्वत आणि नियोजनबद्ध होऊ शकतो. याच भूमिकेतून जुन्या पाण्याच्या टाकीला पर्याय म्हणून अधिक क्षमतेची नवीन टाकी उभारण्याचा निर्णय महत्त्वपूर्ण ठरत आहे. शहराच्या विकासाचा वेग कायम ठेवायचा असेल, तर त्याला पूरक अशा मूलभूत सुविधांची क्षमताही वाढवावी लागेल. विशेषतः पाणी ही नागरिकांची प्राथमिक गरज असल्याने या व्यवस्थेच्या बळकटीकरणाला प्राधान्य देणे गरजेचे आहे. दरम्यान, प्रस्तावित कामाच्या जागेची अलिबाग नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी पाहणी केली. यावेळी मुख्याधिकारी सागर साळुंखे, नगर अभियंता संतोष मुंढे उपस्थित होते.

यावेळी प्रशांत नाईक यांनी सांगितले की, अलिबाग शहर विकसित होत असताना नागरिकांना चांगल्या दर्जाच्या आणि पुरेशा नागरी सुविधा मिळणे आवश्यक आहे. पाणी हे जीवनावश्यक साधन असल्याने पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन करताना भविष्यातील गरजांचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. शहरातील वाढते शहरीकरण लक्षात घेता जुन्या सुविधांचे आवश्यकतेनुसार अपग्रेडेशन करणे गरजेचे आहे. नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यांच्या अपेक्षित सुविधांचा सातत्याने अभ्यास करून त्यामध्ये सुधारणा करण्याचा आमचा मानस आहे. अलिबागच्या विकासाला पूरक अशा पायाभूत सुविधा सक्षम करण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे त्यांनी स्पष्ट केले.

पाच वर्षांचा नियम कागदावर; ३४ कर्मचारी एकाच खुर्चीवर!

शासनाच्या संबंधित निर्णयातील तरतुदींनुसार एकाच विभागात पाच वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय अंतर्गत बदल्यांबाबत कार्यवाही अपेक्षित आहे. मात्र, रायगड जिल्हा परिषदेत ३४ कर्मचारी पाच वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच विभागात कार्यरत असल्याची माहिती समोर आल्याने या तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पाच वर्षांची मुदत पूर्ण होऊनही संबंधित कर्मचाऱ्यांच्या बदल्या का करण्यात आल्या नाहीत? बदल्या न करण्याबाबत सक्षम प्राधिकरणाने कोणते निर्णय घेतले? त्यासाठी कोणती प्रशासकीय कारणे नोंदविण्यात आली? संबंधित कार्यालयीन टिपण्या आणि आदेश उपलब्ध आहेत का? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत.

दीर्घ मुक्कामागचे कारण काय?

प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी अंतर्गत बदल्यांना महत्त्व असते. दीर्घकाळ एकाच विभागात कार्यरत राहिल्याने प्रशासकीय कामकाजावर काय परिणाम होतो, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे. विशेषतः एकाच संवर्गातील कर्मचाऱ्यांसाठी बदली धोरणाची समान अंमलबजावणी होते का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांचे विभागीय नियुक्ती आदेश, प्रत्यक्ष रुजू दिनांक, बदलीसंदर्भातील नोंदी आणि सक्षम प्राधिकरणाचे निर्णय यांची पडताळणी होणे गरजेचे आहे. मात्र, केवळ बदली न झाल्याच्या कारणावरून कोणत्याही कर्मचाऱ्याविरुद्ध गैरव्यवहाराचा निष्कर्ष काढता येणार नाही. त्यामागील प्रशासकीय कारणे आणि शासन निर्णयातील अपवादांची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

प्रशासनाने खुलासा करावा

रायगड जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने या ३४ कर्मचाऱ्यांच्या दीर्घकालीन विभागीय नियुक्तीबाबत स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज आहे. पाच वर्षांची मुदत पूर्ण झाल्यानंतर कोणाच्या बदल्या करण्यात आल्या, कोणाच्या बदल्या प्रलंबित राहिल्या आणि त्यामागील कारणे काय आहेत, याची माहिती सार्वजनिक होणे आवश्यक आहे. शासनाचे बदली धोरण प्रत्यक्षात कितपत राबवले जाते आणि त्याची अंमलबजावणी सर्व कर्मचाऱ्यांसाठी समान आहे का, याचे उत्तर प्रशासनाने देणे गरजेचे आहे.

रायगडच्या हापूसची एन्ट्री

यांनी व्यक्त केला आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गच्या हापूससोबत आता रायगडचा हापूसही मुंबईच्या बाजारपेठेत आपली छाप उमटवण्यासाठी सज्ज झाला आहे. अलिबागच्या जांभूळपाड्यातून वाशी मार्केटपर्यंत पोहोचलेली ही पहिली खेप रायगडच्या आंबा हंगामासाठी नवी आशा घेऊन आली आहे. रायगड जिल्ह्यातील हापूस आंब्याचे महत्त्व, त्याची गुणवत्ता आणि चव यांना मोठ्या बाजारपेठेत अधिक ओळख मिळावी, यासाठी स्थानिक आंबा उत्पादक शेतकरी सातत्याने प्रयत्नशील आहेत. याच प्रयत्नांचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून डॉ. पाटील यांनी आपल्या बागेतील पहिली खेप मुंबईच्या वाशी मार्केटमध्ये पाठवली आहे.

या निमित्ताने रायगड जिल्ह्यातील आंबा उत्पादनाला मोठी बाजारपेठ मिळावी, स्थानिक बागायतदारांच्या कष्टांना योग्य मोबदला मिळावा आणि रायगडच्या हापूसची स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी, हीच अपेक्षा व्यक्त होत आहे.

रायगडच्या बागायतदारांसाठी नवी आशा

यंदाच्या हंगामाच्या सुरुवातीलाच अलिबागच्या हापूस आंब्याची वाशी मार्केटमध्ये झालेली आवक ही रायगडच्या आंबा उत्पादकांसाठी उत्साहवर्धक बाब मानली जात आहे. पहिल्या खेपेला बाजारपेठेत किती भाव मिळतो, याकडे आता आंबा उत्पादकांचे लक्ष लागले आहे. या पहिल्या आवकेमुळे आगामी हंगामातील बाजारभाव आणि मागणीबाबतही उत्सुकता वाढली आहे.

हापूस आंब्याचे दर्जेदार उत्पादन मिळवण्यासाठी वर्षभर बागेची योग्य निगा राखणे, झाडांचे व्यवस्थापन करणे आणि आवश्यक ती काळजी घेणे महत्त्वाचे असते. तसेच, रायगडच्या हापूस आंब्याला बाजारपेठेत योग्य स्थान आणि स्वतंत्र ओळख मिळाली पाहिजे. स्थानिक आंबा उत्पादकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुणवत्तेवर अधिक भर दिल्यास रायगडचा हापूस केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरातील बाजारपेठांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करू शकतो.

– डॉ. संदेश पाटील, आंबा बागायतदार, जांभूळपाडा

दिवेआगारचे सरपंच अडचणीत

प्रतिज्ञापत्रात स्वतःच्या व कुटुंबाच्या मालकीची स्थावर मालमत्ता जाणीवपूर्वक लपवली, अशी तक्रार ग्रामस्थ सिद्धेश कोसबे व महेश पिळणकर यांनी तहसील कार्यालयात दाखल केली होती. माणगाव नगरपंचायत हद्दीतील मालमत्ता क्रमांक २२५ (फ्लॅट क्रमांक ८-२०१, श्री मानजी कॉम्प्लेक्स, उतेखोल) ही तोडणकर यांच्या नावे असतानाही ती शपथपत्रात दाखवण्यात आली नाही, असा दावा अर्जदारांनी केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला देत अर्जदारांनी ही फसवणूक व भ्रष्ट आचार असल्याचे म्हटले होते.

दरम्यान, सरपंच विजय तोडणकर यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. ती मालमत्ता आपली नसून, पत्नीच्या निधनामुळे वारसदार म्हणून नावावर आली असून त्याचा उल्लेख नजरचुकीने राहिला असावा, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच, तक्रारदार हे त्यांचे राजकीय विरोधक असून, मागील निवडणुकीतील पराभवाच्या आणि विविध संस्थांमधील वर्चस्वासंदर्भातील वैमनस्यातून सूडबुद्धीने हा खोटा अर्ज दाखल करण्यात आल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. तहसीलदार न्यायालयाला या प्रकरणाची अधिकारिता नसल्याचा आक्षेपही त्यांनी घेतला होता.

प्रशासकीय कारवाई

दोन्ही बाजूंच्या सुनावणीनंतर आणि माणगाव नगरपरिषद व राज्य निवडणूक आयोगाकडून मागवलेल्या अहवालाची खात्री केल्यानंतर, प्रशासनाने संबंधित मालमत्ता तोडणकर यांच्या नावे असल्याचे स्पष्ट मानले. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रतिज्ञापत्रात खोटी माहिती दिल्याप्रकरणी अखेर श्रीवर्धन महसूल नायब तहसीलदार मनोज माने यांनी सरपंच विजय तोडणकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश पारित केले आहेत.

दिवेआगर ग्रामपंचायत पोटनिवडणुकीत विजयी झालेले विजय तोडणकर यांनी उमेदवारी अर्जावरील शपथपत्रात माणगाव येथील मालमत्तेची माहिती लपवल्याप्रकरणी ग्रामस्थांनी आक्षेप घेतला होता. निवडणूक निर्णयाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांच्या बाजूने निकाल दिला असून, आता सरपंचांच्या अपात्रतेसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे कायदेशीर मागणी करणार आहोत.

– सिद्धेश कोसबे, ग्रामस्थ, दिवेआगर

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे निगडोली, ता. खालापुर, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १ श्री.शैलेश रमणिकलाल शहा, २. सौ.रंजनबेन शैलेश शहा यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

मौजे. निगडोली, ता.खालापुर, जि.रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पै.)
१२	१	०-५०-०० पो.ख. ०-०६-००	६-४७
५	१३/ब	१-८९-०० पैकी १-४९-०० क्षेत्र.	२-०९
१४	२	०-०९-००	०-१२
१३	-	०-३२-००	०-३७
१२	२	०-१०-००	०-१२
११	-	०-९०-८० पैकी ०-६०-५४ क्षेत्र.	०-९७
१०	-	०-८५-००	०-८७
१२	४/क	०-६३-२० पो.ख. ०-०३-३०	५-८७

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकविस) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही.

कर्जत
ता. १९/११/२०२६
मो.नं. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ॲड. समीर हरिश्चंद्र लाड.
फ्लॅट नं. ३०१, राजलक्ष्मी अपार्टमेंट,
विठ्ठल नगर, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी मौजे गाण तर्फे श्रीगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्र.३५/२ एकूण क्षेत्र ०-१७-५० हे. आर, आकार ०-७२ व भूमापन क्र.३४ एकूण क्षेत्र ०-३३-०० हे.आर, आकार ०-५३ या मिळकती तिचे विद्यमान श्री.लालचंद गंगाधर पाटील यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेची ठरविली आहे. सदर विद्यमान मालकांनी ती मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली आहे. तरी, तमाम लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकाव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे कोणताही, कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, आमचे अशिल वर नमूद मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकाबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख: १८/११/२०२६

सही/-
(ॲड.प्रसाद विजय वर्तक)
जिल्हा न्यायालय अलिबाग

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता/जागा माझे अशिल श्री.रमाकांत काशिनाथ तांडेल यांच्या मालकीची असून सदरची मालमत्ता/जागा विकण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मौजे थळ, ता.अलिबाग, येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ६०/४, यामध्ये एकूण क्षेत्र ०-१९-८० हे आर, आकार रु. ४.६९ पैकी, श्री. रमाकांत काशिनाथ तांडेल यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-०३-४४ हे.आर. आकार रु. ०.८१ हि मिळकत.

वर नमूद मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, रजिस्टर्ड अगर अनरजिस्टर्ड साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र, भाडेपट्टा, जप्ती, लीज, लियन, अन्नवस्त्र-पोटगी, वारसाहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत त्यासंबंधातील लेखी हरकत पुराव्यासह खाली नमूद पत्त्यावर कळवावी.

या नोटीसमध्ये नमूद केलेल्या मुदतीत कोणीही कसल्याही प्रकारची हरकत लेखी स्वरूपात न कळविल्यास सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजुन तसेच सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी सोडून दिला आहे, असे समजुन आमचे अशिल वरील वर्णनाच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व सदरच्या व्यवहारानंतर कोणीही कोणत्याही प्रकारची हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : १८/११/२०२६

ॲड.रुपिका विजय पाटील
बी.एल.एस.एल.एल.बी.
पत्ता : ॲकॉन्स क्लासिक, अलिबाग कोर्टच्या समोर, अलिबाग- रायगड
कॉल : ८२३७५३१४१४

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे किहीम, तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग, दुय्यम निबंधक अलिबाग, यांच्या स्थळ सिमेतील व ग्रुप ग्रामपंचायत किहीम हददीतील, तलाठी सजा किहीम, यांचे कार्यकक्षेतील शेतजमीन भुमापन क्रमांक व उपविभाग २२७ सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषीक मिळकतीचे एकूण क्षेत्र ११-२०-०० चौरस मिटर, सर्व ऋणबोजेमुक्त अशी खालील परिशिष्टात नमुद केलेली अकृषीक मिळकत (इथून पुढे 'सदर मिळकत' असा उल्लेख केला आहे.) सदर मिळकतीबाबत माझे आशिलांनी सौ.हेमलता बाळकृष्ण पार्टे यांचेसोबत व्यवहार करणेचे निश्चीत केले आहे. सदर मिळकतीबाबत मालकी हक्क, बयाणा, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, लीन, जामीन, कुळ, भाडेकरू, वारसा हक्क देखभाल, लिव्ह ॲन्ड लायसेन्स, साठेकरार वा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास वा तसा दावा करणाऱ्या व्यक्तींनी, संस्था व संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ कार्यालयीन दिवसांचे आत आपले हक्क हितसंबंध विषद करून खालिल नमुद पत्यावर लेखी कळवावे, वरील नमुद मुदतीत कोणतीही हरकत, दावा, तक्रार वा लेखी म्हणणे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून योग्य तो दस्त नोंदवून हक्कदाखला देण्यात येईल, मुदतीनंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही व मुदतीनंतर घेतलेली हरकत आमचेवर व आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, कळावे ही जाहिर नोटीस.

परिशिष्ट

जमिनीचे वर्णन : मौजे किहीम, तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, तालुका पंचायत समिती अलिबाग, दुय्यम निबंधक अलिबाग, यांच्या स्थळ सिमेतील व ग्रुप ग्रामपंचायत किहीम हददीतील तलाठी सजा किहीम, यांचे कार्यकक्षेतील शेतजमीन भुमापन क्रमांक व उपविभाग २२७ सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषीक मिळकतीचे एकूण क्षेत्र ११-२०-०० चौरस मिटर सर्व ऋणबोजेमुक्त अशी अकृषीक मिळकतीकरीता.

दिनांकः १८.११.२०२६

कविता संदीप भोसले (वकील)
केशव हाईटस्, बी विंग, ९० फीट रोड, पारसिक नगर, कळवा, ठाणे ४००६०५
मोबाईल नं. ९९८७८०६०२२

SARASWATI EDUCATION SOCIETY
DR. N. Y. TASGAONKAR COLLEGE OF PHYSIOTHERAPY

Dr. N. Y. Tasgaonkar Educational Campus, At. Chandhai, Post. Nasarapur, Tal. Karjat, Dist. Raigad - 410 201

CAREER OPPORTUNITIES - FACULTY RECRUITMENT

Applications are invited from qualified, experienced and eligible candidates for the following teaching and clinical positions at Dr.N.Y.Tasgaonkar College of Physiotherapy, as per the applicable guidelines of the National Commission for Allied and Healthcare Professions (NCAHP) and other regulatory authorities.

Sr.No.	Designation	Speciality	Vacancies
1	Associate Professor	Cardiovascular & Respiratory Physiotherapy	02
2	Associate Professor	Community Physiotherapy	01
3	Associate Professor	Neuro Physiotherapy	01
4	Assistant Professor	Neuro Physiotherapy	02
5	Assistant Professor	Cardiovascular & Respiratory Physiotherapy	01
6	Assistant Professor	Community Physiotherapy	02
7	Clinical Physiotherapist	MPT in any speciality	06
8	Demonstrators	BPT with minimum 2 years' experience	20

Eligibility : Candidates must possess the requisite educational qualifications, experience and other eligibility criteria as prescribed by the applicable regulatory guidelines.

How to Apply: Interested candidates are requested to send their updated resumes along with relevant qualification and experience details to:

Email : hr.chandhai@tasgaonkartech.com

Contact for Further Details:
- Mr. Vinit Raut - 9029730040
- Ms. Tanvi Gaikwad - 7757886237
- Ms. Chitra Jawale - 9225216579

Apply Now! Be a Part of Our Academic Excellence Team.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री.बबन बाळाजी पुशिलकर, रा.भैरव, सतिश सुरेश शिंदे, व संजय मोंगीलाल ओसवाल, दोघेही रा पाली यांचे कडून कायम खरेदी करणार असून तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे - भैरव, तालुका- सुधागड, जिल्हा - रायगड

खाता नं.	गट नं.	क्षेत्र (हे.आर)	आकार (रू.पैसे)
५४३	३९५	०-६९-७० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-४७-७०	४.०८ २.६९

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकानी आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकतीं निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : १९/११/२०२६

सही /-
ॲड.नोएल सॅमसन चिंचोलकर
मु.पो.पाली.एकतापथ,
ता.सुधागड, जि.रायगड, ४१०२०५
मो.नं.९२७१९२३९०३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमीन मालक श्री.तुषार बाळू घरत यांचे ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिस्स्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिल श्री.नितीन उत्तम साळवे यांनी त्यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहू जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे कोठिंबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन

भूमापन क्र.७० उपविभाग क्र. १ क्षेत्र ०.११.६० हे.आर.चौ.मी.
आकारणी ०.९० रु. पै.

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने, कोणताही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणारे खरेदीदाराचे वकील यांस संपर्क साधावा अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजण्यात येऊन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाणः कर्जत
दिनांक : १८/११/२०२६

सही/-
कुसुम किरण घरत
ॲडव्होकेट व नोटरी
पत्ताः पीएल ६ए/६/०:२,
एमएसईबी ऑफीस जवळ,
सेक्टर १, खांदा कॉलनी, नवीन पनवेल
मोबाईल नं. ९९६७३३५०४६

अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात

जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग जि. रायगड
क्रमांक/आरटीएस/अपील क्र.४४१/२०२६

१ श्रीम.वत्सला शंकर पाटील
रा.एफ साऊथ, एस एम ६१, ५/१०, म्युसिपल चाळ नं.६९ चे बाजूला, शिवडी कोळीवाडा, शिवडी पूर्व, मुंबई - ४०००१५ — अपिलार्थी

विरुध्द

१ श्रीम.सुनिता नरेंद्र केणी
रा.चरी कोलटेंभी, पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड — उत्तरार्थी

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील

या जाहिर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे गाण तर्फे श्रीगांव, ता.अलिबाग, जि.रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ८ क्षेत्र ०-१०-४० हे.आर.आकार १.७५, भूमापन क्रमांक व उपविभाग ९ क्षेत्र ०-२३-०० हे.आर.आकार २.८१ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचेकडील विलंब माफी अर्ज क्र. ११५/२०२५, दि.२१/०७/२०२

जबाबदार यंत्रणेविरोधात गुन्हा दाखल करा

शेकापच्या सुरेश घरत यांची मागणी



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील बेलकडे ते कुरुळ रस्त्याचे काम सुरु आहे. मात्र, नियोजनाअभावी वाहतूक कोंडीचा फटका प्रवाशांना बसत आहे. नुकताच वाहतूक कोंडीत अडकून एका दोन वर्षाच्या मुलाचा उपचाराविना मृत्यू झाला. त्यामुळे बालकाच्या मृत्यूप्रकरणी संबंधित ठेकेदार आणि जबाबदार यंत्रणाविरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी केली. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि अलिबागचे पोलीस निरीक्षक किशोर साळे यांना बुधवारी (दि.१८) निवेदन दिले. तसेच, मृत बालकांच्या कुटूंबियांना संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाकडून ५० लाख रुपयांची आर्थिक मदत करावी, असेही निवेदनातून नमुद केले आहे.


यावेळी शेकाप तालुका महिला आघाडी प्रमुख नागेश्वरी हेमाडे, अलिबाग पंचायत समितीच्या सदस्या अंजली ठाकूर, नयन पाटील, विभागीय चिटणीस संदीप गायकवाड, शोधन ठाकरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत अलिबाग-रेवदंडा मार्गावरील रखडलेले कुरुळ ते बेलकडेचे काम गेल्या काही दिवसांपुर्वी सुरू करण्यात आले. हा मार्ग कायमच वर्दळीचा आहे. या मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून पर्यायी रस्त्याची व्यवस्था करणे, नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घेण्यासाठी आवश्यक नियोजन करणे गरजेचे होते. ठेकेदारासह संबंधित यंत्रणेची ही जबाबदारी होती. हे काम दिवाळीनंतर सुरु करण्याची सुचना वाहतूक विभागाने दिली होती. तरीदेखील त्याकडे दूर्लक्ष करीत ठेकेदाराने काम सुरु केले. मात्र, ठेकेदारांनी रस्त्याचे काम करताना योग्य नियोजन व पर्यायी वाहतूक व्यवस्था केली नाही. त्याचा फटका या मार्गावरील प्रवाशांना बसला. तासनतास एकाच ठिकाणी वाहने उभी राहिल्याने मोठी वाहतूक कोंडी झाली. या वाहतूक कोंडीमध्ये अडकून एक वर्षे आठ महिन्याच्या आरांश ठाकूर या बालकाचा उपचाराविना मृत्यू झाला. कोंडीत अडकल्याने त्याला उपचारासाठी रुग्णालयात वेळेवर पोहचता आले नाही. या घटनेला जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदार, अधिकारी, तसेच जबाबदार यंत्रणाची चौकशी करून दोषींविरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याचबरोबर मृत बालकांच्या कुटूंबियांना संबंधित ठेकेदार आणि प्रशासनाकडून ५० लाख रुपयांची आर्थिक मदत करावी. या मागणीची तातडीने दखल घेऊन कार्यवाही करण्यात यावी. तसेच, वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी. अन्यथा शेकापच्यावतीने तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी दिला.

> अलिबाग-रेवस मार्गावरील रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरु आहे. ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत. वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या या रस्त्याचे काम संथ गतीने सुरु आहे. त्याचा फटका प्रवाशांसह पर्यटकांना बसत असून, वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे. कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी ठेकेदारांनी योग्य नियोजन करावे. पर्यायी रस्त्याची व्यवस्था करावी. दिशा दर्शक फलकांचा अभाव असल्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवास करताना प्रवाशांना प्रचंड त्रास होतो. ज्या रस्त्याची कामे पुर्ण झाली आहेत, त्या रस्त्याच्या दुतर्फा असलेली साईट पट्टी तात्काळ भरण्यात यावी.
> - संदीप गायकवाड, विभागीय चिटणीस, शेतकरी कामगार पक्ष

रामदासची कला जागतिक प्रदर्शनात झळकणार

ग्रामीण जीवन, निसर्ग चित्रांतून होणार व्यक्त



| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील बीड सारख्या अतिअशय ग्रामीण भागातील चित्रकार रामदास लोभी यांनी आपली चित्रकला फुलवली. मोठ्या संस्थेत शिक्षण घेऊन आपल्या चित्रकलेला ग्रामीण टच देणारे चित्रकार रामदास लोभी यांच्या चित्रांचे प्रदर्शन सातासुमद्रापार भारावले जात आहे. पर्यटन देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुबई महानगरातील वर्ल्ड गॅलरीमध्ये प्रदर्शन भरणार आहे. बीड बुद्रुकच्या कलाकाराची आंतरराष्ट्रीय कला विश्वात भरारी घेण्याचे कार्य या प्रदर्शनाच्या माध्यमातून होत आहे.

चित्रकार रामदासचा यापूर्वीचा कलाप्रवासही उल्लेखनीय राहिला असून सिंगापूर, दुबई येथे त्यांची एकल चित्रप्रदर्शने आयोजित करण्यात आली होती. याशिवाय दिल्ली, मुंबई, हैदराबाद, बंगळुरू यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये त्यांच्या चित्रप्रदर्शनांचे आयोजन झाले आहे. त्यांची चित्रकृती भारतासह विविध देशांतील कला संग्राहक आणि कलाप्रेमींच्या संग्रहात स्थान मिळवत आहेत.

ग्रामीण जीवन, निसर्ग, मानवी संवेदना आणि सभोवतालच्या पर्यावरणाचे विविध पैलू त्यांच्या चित्रांमधून प्रभावीपणे अभिव्यक्त होतात. आपल्या कलाशैलीतून स्थानिक मातीशी असलेले नाते जपत त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कला विश्वात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. बीड बुद्रुकसारख्या ग्रामीण भागातून सुरू झालेला त्यांचा हा कलाप्रवास आता जागतिक व्यासपीठापर्यंत पोहोचला आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विविध देशांतील कलाकारांना आपल्या कलाकृती जागतिक कला क्षेत्रासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे.

निवडक



रश्मी पाटील यांना आदर्श सरपंच पूरस्कार

रायगड : अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायतीच्या सरपंच रश्मी रविंद्र पाटील यांना आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त झाला आहे. ग्रामविकास क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत महाराष्ट्र ग्रामविकास परिषदेतर्फे पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली होती. आदर्श सरपंच पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. आक्षी गावाच्या सरपंच रश्मी पाटील या राजकीय, सामाजिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. राजकीय क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. आक्षी ग्रामपंचायत हद्दीतील गावे, वाड्यांचा विकास साधण्याबरोबरच वेगवेगळ्या योजना पोहचविण्यासाठी त्या कार्य तत्पर राहिल्या आहेत. त्यामुळे ग्राम विकास क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल पुणे येथील महाराष्ट्र ग्राम विकास परिषदेने घेऊन त्यांची आदर्श सरपंच म्हणून निवड केली. हा पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला. यावेळी त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

गाढी नदीवर उभारणार पूल



खांदा कॉलनी : पनवेल उरण नाका येथील पुलावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. सकाळी कार्यालयीन वेळेत तसेच सायंकाळी घरी परतताना या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. काही वेळा अवघ्या काही अंतरासाठी वाहनचालकांना बराच वेळ वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागते. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करंजाडे ते पनवेलदरम्यान गाढी नदीवर नवीन पुलाच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली आहे. या पुलामुळे करंजाडे परिसरातून पनवेल शहरात येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सध्या उरण नाका येथील पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा होत असल्याने या ठिकाणी वाहतुकीचा ताण वाढत आहे. नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या परिसरातील वाहतुकीचे नियोजन अधिक चांगल्या पद्धतीने करता येणार आहे. उरण नाका येथील पुलावरील वाहनांचा भार कमी होण्यास मदत होईल. विशेषतः दुचाकी, चारचाकी वाहनचालकांना वाहतूक कोंडीतून दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. तसेच करंजाडे आणि पनवेल शहरादरम्यानचा प्रवास अधिक सुलभ होऊ शकतो. महानगरपालिकेने हाती घेतलेल्या या कामामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.काम पूर्ण करुन पुलाचे लोकार्पण करून तो वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा, अशी अपेक्षा वाहनचालकांकडून व्यक्त होत आहे.

घरफोडी प्रकरणी दोघांना अटक

पनवेल : घरफोडी करून चोरी करणाऱ्या टोळीतील दोघांना पनवेल तालुका पोलिसांनी अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे फिरवत पोलिसांनी आरोपींचा शोध घेतला. या कारवाईत चोरीचा मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली होंडा सिटी कार, असा एकूण ५ लाख २१ हजार रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आलम मनियार (वय ३५) सतेंद्र चौहान (वय २१) यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गिजे, पोउनि शेळके, पोहवा कुदळे, काजरोळकर, तांडेल, बाबर, देवरे, वायकर आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे अटक करण्यात आली आहे. दोघेही मूळचे उत्तर प्रदेशातील रहिवासी आहेत.पोलिसांनी आरोपींकडून १४ हजार रुपये किमतीचे डिवॉल्ट कंपनीचे कटिंग मशीन, ७ हजार रुपये किमतीचे व्हर्गो कंपनीचे वेल्डिंग मशीन आणि ४ लाख रुपये किमतीचे चार पीसीबी बोर्ड जप्त केले आहेत. तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली एक लाख रुपये किमतीची सिल्व्हर रंगाची होंडा सिटी कार (एमएच ४३ आर ६६३७) ताब्यात घेतली आहे. अशा प्रकारे एकूण ५ लाख २१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.या गुन्ह्यातील आणखी दोन पाहिजे आरोपींचा शोध सुरू असून, चोरीच्या उर्वरित मुद्देमालाचा तपासही पोलीस करीत आहेत.

जयंत पाटील यांच्याकडून देशमुख कुटुंबाचे सांत्वन



| अलिबाग | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील सामाजिक नेते व्ही. टी. देशमुख यांच्या कन्या स्नेहा शिरिष आंब्रे यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. या दुःखद प्रसंगी शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी रोहा येथील देशमुख यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करुन त्यांना धीर दिला. यांच्या भेटीदरम्यान उपस्थित कार्यकर्त्यांनी स्नेहा यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली.

या सांत्वनपर भेटीप्रसंगी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, जिल्हा बँकेचे संचालक गणेश मढवी, जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, शेकाप तालुका चिटणीस शिवराम महाबळे, खांडेकर आण्णा, प्रताप देशमुख, मनोहर महाबळे, खांडेकर सर, गोपीनाथ गंभै, विकास तांडेल, महादेव शिंगरे, आरे बु सरपंच राजेंद्र मळेकर, युवक अध्यक्ष संतोष दिवकर, अमोल शिंगरे शंकर दिवकर, महिला आघाडी प्रमुख रोहा कांचन ताई माळी, खेळू ढमाल, राजू तेलंगे, प्रविण जांभेकर, तुकाराम शिंदे, सुयोष गांगल तसेच शेतकरी कामगार पक्ष रोहा तालुका कार्यकत, ज्येष्ठ नेते, सरपंच उपसरपंच आदी पदाधिकारी होते.

२३ वर्षीय तरुणाची चाकूने हत्या

पनवेल: कर्जाचे हप्ते वेळेवर न भरल्याने कर्जवसुलीचे फोन येत असल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून २३ वर्षीय तरुणाची करण्यात आली. या प्रकरणी प्रतीक जाधव (३०) याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. प्रतीक कर्जाचे हप्ते भरत नसल्यामुळे कर्जवसुलीचे फोन येत असल्याने दोघांमध्ये वाद झाला. त्यावेळी जाधवला लाथ मारुन याच्यावर वार करून त्याला जखमी केले. या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अल्पवयीन विद्यार्थिनीचा विनयभंग

| नागोठणे | प्रतिनिधी |

परीक्षा देऊन घरी परतणाऱ्या एका १७ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा एसटी बसमध्ये चढताना विनयभंग केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि.१७) नागोठणे एसटी स्टँडवर घडली. याप्रकरणी पीडित मुलीने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे ६० वर्षीय आजीम अहमदमिया मुजावर याला नागोठणे पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेण तालुक्यातील पिडीत विद्यार्थिनी ही वरवठणे येथील एस.एस.ओ.एस.पी. डिप्लोमा कॉलेजमध्ये अंतिम वर्षात शिक्षण घेत आहे. ती मंगळवारी सहामाहीचा पेपर देऊन सायंकाळी आपल्या मैत्रिणीसोबत नागोठणे एसटी स्टँडवर आली. त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास पेण-पाली या एसटी बसमध्ये चढत असताना बसला मोठी गर्दी होती. याच गर्दीचा फायदा घेत बाजूला उभ्या असलेल्या ६० वर्षीय व्यक्तीने १७ वर्षीय विद्यार्थिनीचा विनयभंग केला. हा प्रकार लक्षात येताच पीडित मुलीने आरडाओरडा करत संबंधित व्यक्तीचा शर्ट पकडला. त्यानंतर पीडित मुलगी आणि तिच्या मैत्रिणीने त्या व्यक्तीला पकडून थेट एसटी कंट्रोलरकडे नेले आणि तेथून नागोठणे पोलीस ठाण्यात हजर केले. त्यानंतर पीडित मुलीने तिचे वडील आणि महिला दक्षता समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत नागोठणे पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून नागोठणे पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला.

आरांशच्या कुटूंबियांचे चित्रलेखा पाटील यांच्याकडून सांत्वन



प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी

● (छायाचित्रः अमोल नाईक)

| अलिबाग | प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील बामणगाव-खारीकपाडा येथील आरांश ठाकूर या दोन वर्षाच्या बालकाचा दोन दिवसांपूर्वी दुर्देवी मृत्यू झाला. शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी बुधवारी (दि.१८) खारीकपाडा निवासस्थानी जाऊन आरांशच्या कुटूंबियांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी त्यांना धीर देत शेतकरी कामगार पक्ष तुमच्या पाठीशी उभा असेल. रस्त्याच्या ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची शेकापने मागणी केलेली असून, कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळवून देण्यास पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही चित्रलेखा पाटील यांनी दिली.

खेळताना फुगा गिळल्याने आरांश सुशील ठाकूर या एक वर्षे आठ महिन्याच्या बालकाचा सोमवारी (दि.१६) दुपारी श्वास कोंडला. ही बाब त्याच्या आई-वडीलांच्या लक्षात आल्यावर त्याच्यावर तातडीने उपचार व्हावे, म्हणून जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. मिळेल, त्या वाहनाचा आधार घेत जिल्हा रुग्णालय गाठण्याचा प्रयत्न केला. मात्र, बेलकडे-कुरुळ मार्गावर सुरु असलेल्या रस्त्याच्या कामांमुळे ३ किलो मीटर अंतरावर दोन्ही बाजूने मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या वाहतूक कोंडीतून मार्गच मिळत नव्हता. त्यामुळे पंधरा-वीस मिनिटांच्या अंतराकरिता जवळपास दोन तासांच्या प्रयत्नानंतर रुग्णालय गाठले. मात्र, जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासून तो मृत झाल्याचे घोषित केले. आरांशच्या दुर्देवी मृत्यूबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील ठेकेदारासह प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, बुधवारी दुपारी खारीकपाडा येथे जाऊन आरांश ठाकूर यांच्या कुटूंबियांची भेट घेतली. आरांशच्या आई, वडीलांची विचारपूस करून त्यांना धीर दिला. यावेळी शेकाप ज्येष्ठ नेते अनिल पाटील, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य सतिश भगत, अनंत थळे अमित थळे, प्रतिक खारकर, चंद्रकांत ठाकूर, अंकित ठाकूर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व आरांश ठाकूरचे आई-वडील उपस्थित होते.

मांडूळ सापाचे नैसर्गिक अधिवासात पुनर्वसन



तस्करीपासून वन्यजीवांचे संरक्षण करण्याचे आवाहन

| खोपोली | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील ताकई गावाच्या हद्दीत दुर्मिळ मांडूळ जातीचा साप आढळल्याने परिसरात उत्सुकता निर्माण झाली. सोमवारी (दि.१६) रोजी स्थानिक युवक सुमित आणि नयन पाटील यांनी प्रसंगावधान राखत सर्पमित्रांशी संपर्क साधत सर्पमित्रांच्या तत्परतेमुळे या सापाला कोणतीही इजा न पोहोचवता सुरक्षितपणे पकडण्यात आले. त्यानंतर खालापूर वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली त्याचे नैसर्गिक अधिवासात पुनर्वसन करण्यात आले.

सर्पमित्र दिनेश ओसवाल यांनी गुरुनाथ साठेलकर यांच्यासह घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी करून आवश्यक खबरदारी घेऊन मांडूळ सापाचे सुरक्षित रेस्क्यू केले. त्यानंतर या घटनेची माहिती तातडीने खालापूर वन विभागाला देण्यात आली.

मांडूळ सापाबाबत समाजात आजही अनेक गैरसमज आणि अंधश्रद्धा आहेत. या सापाची मोठ्या आर्थिक किमतीत खरेदी-विक्री होते, अशा अफवा पसरवल्या जातात. अशा अफवांमुळे दुर्मिळ वन्यजीवांच्या बेकायदेशीर तस्करीला खतपाणी मिळण्याची शक्यता असते म्हणून खालापूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राजेश खांडेकर, बाळू रोडे यांनी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करत सापाला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

या रेस्क्यू मोहिमेत अमोल ठकेकर, सुनील पुरी, अमोल कदम, श्रीकांत जाधव यांनी सर्पमित्रांच्या तत्परतेचे कौतुक करताना वन्यजीव संरक्षणासाठी नागरिकांनीही पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

मटका-जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातील कोळीवाडा परिसरात सुरू असलेल्या कल्याण मटका आणि मेन मटका जुगाराच्या अड्ड्यावर पनवेल शहर पोलिसांनी धडक कारवाई केली. या कारवाईत १२ हजार ७४० रुपयांची रोकड आणि जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त केले.

१७ नोव्हेंबर रोजी कोळीवाडा नदीकाठी सार्वजनिक शौचालयासमोरील मोकळ्या जागेत काही जण स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कल्याण मटका खेळवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाड टाकून कारवाई केली. या कारवाईत दत्ता शेलार, सनी सोनवणे, अनिल गवांदे आणि शिवा पवार या चौघांना ताब्यात घेण्यात आले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोलीस नाईक अनिल चव्हाण, पोलीस शिपाई दत्ता जाधव आणि सचिन कोर यांच्या पथकाने ही कारवाई केली. यापुढेही कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी दिला.

विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमणार परिसर | **२१ नोव्हेंबरपासून १५ दिवस यात्रेची धूम**

साजगावात रंगणार विठोबाचा यात्रोत्सव



| खोपोली | प्रतिनिधी |

श्रद्धा, भक्ती आणि ग्रामीण संस्कृतीचा अनोखा संगम असलेल्या साजगावच्या प्रसिद्ध बोंबल्या विठोबाच्या यात्रेचे वेध पंचक्रोशीला लागले आहेत. कार्तिकी एकादशीच्या पर्वावर २१ नोव्हेंबरपासून या यात्रेला प्रारंभ होणार असून तब्बल १५ दिवस साजगाव परिसर भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात न्हाऊन निघणार आहे. विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणारे भाविक, पारंपरिक बैल बाजारासाठी दाखल होणारे शेतकरी आणि खरेदी-विक्रीसाठी येणारे नागरिक यामुळे यंदाही यात्रेला मोठी गर्दी होण्याची अपेक्षा आहे.

साजगावच्या बोंबल्या विठोबाच्या यात्रेला अनेक वर्षांची परंपरा लाभली आहे. मुंबई-पुणे महामार्गालगत भरणाऱ्या या यात्रेचे धार्मिक महत्त्व खालापूर तालुक्यापुरते मर्यादित नसून रायगड जिल्ह्यासह मुंबई आणि पुणे परिसरातील भाविकही या यात्रेत सहभागी होतात. यात्रेच्या पार्श्वभूमीवर यात्रा कमिटीच्या वतीने जय्यत तयारी सुरू असून दुकाने, स्टॉल्स आणि मनोरंजनाच्या साधनांची उभारणी अंतिम टप्प्यात आली आहे.

यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन आणि धार्मिक कार्यक्रम. भजन, कीर्तन तसेच पालखी सोहळ्याच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भाविकांची मांदियाळी यामुळे साजगाव परिसरात भक्तीचा जागर अनुभवायला मिळणार आहे.

२१ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या या यात्रेच्या स्वागतासाठी ग्रामस्थ, भाविक आणि व्यापारी सज्ज झाले असून पंचक्रोशीला आता यात्रेची ओढ लागली आहे.

आर्थिक उलाढालीची संधी

१५ दिवस चालणाऱ्या या यात्रेमुळे परिसरात मोठी आर्थिक उलाढाल होते. बाहेरील व्यापारी, व्यावसायिक आणि छोटे विक्रेते मोठ्या संख्येने साजगावमध्ये दाखल होत असल्याने स्थानिक व्यवसायालाही चालना मिळते. ग्रामीण भागातील पारंपरिक बाजारपेठ आणि लोकसंस्कृती जिवंत ठेवण्याचे काम ही यात्रा अनेक वर्षांपासून करीत आहे.

खरेदीची रेलचेल

धार्मिक महत्त्वाबरोबरच साजगावची यात्रा पारंपरिक बाजारपेठेसाठीही प्रसिद्ध आहे. बैल बाजार हे यात्रेचे खास वैशिष्ट्य असून शेतकरी आणि पशुपालकांसाठी तो महत्त्वाचा आकर्षणबिंदू ठरतो. याशिवाय सुकी मच्छी, घोंगड्या, चादरी, विविध घरगुती वस्तू, खाद्यपदार्थ आणि गरमागरम जिलेबीच्या दुकानांनी यात्रेची बाजारपेठ सजणार आहे. आकाशपाळणे आणि विविध मनोरंजनाची साधने लहान मुलांसह आबालवृद्धांचे लक्ष वेधून घेणार आहेत.

आरांशचा बळी कोणी घेतला

आरांश सुशील ठाकूर याच्या मृत्यूने अलिबाग तालुकाच नव्हे तर संपूर्ण रायगड जिल्हा सुन्न आहे. एक वर्ष आठ महिने वयाच्या या बालकाच्या मृत्यूला जबाबदार कोण असा सवाल सर्वांनाच पडला आहे. रस्त्याचे ठेकेदार, सरकारी अधिकारी यांची जिम्मेदारी पहिली आहे यात शंकाच नाही. पण आरांशला घेऊन जाणाऱ्या वाहनाला वाट न करून देणाऱ्यांनीही आपली जबाबदारी स्वीकारायला हवी. एकूणच आपल्या समाज कसा मोडकळून गेला आहे याचे हे विदारक चित्र आहे. सोमवारी दुपारी म्हणजे दीडच्या सुमारास आरांशने खेळता खेळता फुगा गिळला. त्याने त्याचा श्वास गुदमरू लागला. त्यानंतर पुढे जे घडले त्यातून आपल्या समाजाचा श्वासच कसा कोंडला गेला आहे व त्यातून एक नागरी समाज म्हणून आपण कसे मरणाच्या दारात आहोत याचे दर्शन घडले. आरांशच्या आईवडिलांनी फ ुगा बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पण ते शक्य होत नाही हे पाहताच त्यांनी जिल्हा रुग्णालयात आणण्याचा निर्णय घेतला. पण बेलकडे ते कुरुळदरम्यानच्या वाहतूक कोंडीने त्यांचा घात केला. यातही इतक्या गंभीर प्रसंगात मदत होऊ शकेल असे रुग्णालय, डॉक्टर त्यांच्याच आसपास नसावा किंवा पालकांना तिकडे जाणे कोणत्याही कारणाने शक्य नसावे ही दारुण स्थिती आहे. पुढील प्रसंग सर्वांना ठाऊक झाला आहे. आरांशच्या आईने वाहतूक कोंडीतून पुढे जाता यावे म्हणून वाहनचालकांची मनधरणी केली. त्यांच्या ती हातापाया पडली. पण कोणालाही दया आली नाही. किंवा आपण कसे बाजूला व्हावे हे कोणालाही कळले नाही. तशा पध्दतीची शिकवण आपल्याला दिलीच जात नाही. एरवीही जागा मिळेल तिथून गाडी घुसवणे व आपण काहीही करून पुढे जाणे हेच प्रत्येकाला इतिकर्तव्य वाटत असते. त्याचा कडेलोट परवा झाला. त्याने एका अश्राप बालकाचा जीव घेतला. आता तरी त्या दिवशी त्या रस्त्यावर वाहने चालवणाऱ्यांचे डोळे उघडतील. त्यांना स्वतःची लाज वाटेल, अशी आशा आहे.

ठेकेदाराला पकडा

अर्थात, समाजाच्या माणुसकीचा आणि सामाजिक भानाचा हा प्रश्न असला तरी याला खरे जबाबदार सरकार व रस्त्याचे काम करणारे ठेकेदार हेच आहेत. या मृत्यूला ठेकेदार व प्रशासनाचा निष्काळजीपणा जबाबदार असून संबंधितांविरुध्द सदोष म नुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाने केली आहे. या मार्गावरच्या बेलकडे ते कुरुळदरम्यानच्या रस्त्याचे काम एमआयडीसीमार्फत सुरू आहे. हे काम दिवाळीपूर्वी हाती घेण्यात आले होते. मात्र प्रत्यक्ष काम दिवाळीच्या सुट्यानंतरच सुरू करावे अशा सूचना पोलिसांनी दिल्या होत्या. मात्र त्यांना कळवता परस्परच ऐन दिवाळीत काम सुरू करण्यात आले. त्यामुळे रस्त्यावर गेले काही दिवस अतोनात वाहतूक कोंडी होत असून पोलिसांचे त्यावर काहीही नियंत्रण नाही. आता हा बळी गेल्यानंतर सर्व यंत्रणांना कदाचित जाग येईल व पोलिस सतर्क होऊन या वाहतुकीला थोडीफार शिस्त लावतील. पण त्यासाठी एका आईबापांना पोटचा गोळा गमवावा लागला आहे. एरवी बेलकडे फाटा ते अलिबाग हे अंतर दहा ते पंधरा मिनिटात गाठता येते. पण त्या दिवशी दीड ते दोन तास मुलाचे आईवडील वाहतूक कोंडीतच अडकून पडले. याचा अर्थ एक आणीबाणीचा प्रसंग घडलेला असतानाही आपल्या यंत्रणा त्वरीत सतर्क झाल्या नाहीत. मुंबई किंवा दिल्लीमध्ये हृदयविकाराच्या रुग्णावरील तातडीच्या उपचारांसाठी ग्रीन कॉरिडॉर म्हणजे वाहनांखेरीजचा रस्ता कसा निर्माण करण्यात आला याच्या बातम्या होतात. शहरांमध्ये काही वेळेला रुग्णांना एअर एम्ब्युलन्सची सुविधाही मिळू शकते. पण त्याच मुंबईपासून दोन तीन तासांवर असलेल्या अलिबागजवळ एका मुलाला वाहतूक कोंडीत जीव गमवावा लागतो हे आपल्या आजच्या विकासाचे खरे चित्र आहे. पर्वत जर महंमदाकडे येत नसेल तर महंमदाने पर्वताकडे गेले पाहिजे अशी एक इंग्रजी म्हण आहे. कालच्या प्रसंगामध्ये आरांश जर का रुग्णालयापर्यंत पोचण्यास अडचण येत होती तर आपल्या सर्व यंत्रणांनी सतर्क होऊन पोलिस व अद्ययावत रुग्णवाहिका त्याच्यापर्यंत पोचण्याची काहीतरी व्यवस्था व्हायला हवी होती. निदान तसा विचार व्हायला हवा होता. पण भारत हा गरीब आणि मागास देश आहे, इथे गोष्टी अशाच होतात असे म्हणून सर्व समाज व यंत्रणा सुस्त राहतात.

विकास नव्हे विकृत प्रगती

सागरी मार्गाचा भाग म्हणून या रस्त्याचे काम चालू असून सिमेंटचे रस्ते तयार केले जात आहेत. त्यासाठी चांगले असलेले डांबरी रस्ते उखडले गेले. हे कोकणात सर्वत्र घडले आहे. मुंबईतही याच रीतीने सिमेंटचे रस्ते म्हणजे चकाचक आणि दीर्घ काळ चालणारे रस्ते असे स्वप्न दाखवण्यात आले. प्रत्यक्षात हे काम इतके रद्दी केले गेले की सिमेंटचे रस्तेही जागोजागी खराब झाले आहेत. ते करण्यासाठी कित्येक दिवस वाहतूक बंद ठेवली जाते वा एका बाजूने सुरू राहते. त्याचा सर्वांनाच फटका बसतो. या रस्त्यांसाठी खडी टाकण्याचे काम अत्यंत तंत्रशुध्द रीतीने करावे लागते. पण बहुतेकदा यावर कोणाचीच देखरेख वा नियंत्रण नसते. दुसरे म्हणजे रस्ते तयार होतानाही प्रशासनाला गुंडाळून ठेवले जाते. यामध्ये आपले लोक वाटेल तशा गाड्या घुसवून भर घालतात. एका लेनमधून गाड्या चालवाव्या ही शिस्त आपल्याकडे पाळली जात नाही. समोरून येणाऱ्या वाहनांचा मार्ग अडवला जातो. सर्व स्तरांवरचा भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा व बेशिस्त यांचे दर्शन अशा रस्त्यांच्या कामातून होत असते. मंत्री आणि नेते दणादण रस्त्यांच्या कामांची घोषणा करतात. अमुक हजार कोटी खर्च करणार असे जाहीर केले जाते. पण ही कामे करताना लोकांना कमीत कमी त्रास होईल, आरांशसारख्या रुग्णांच्या वाट्याला भीषण प्रसंग येणार नाहीत याची काहीच व्यवस्था केली जात नाही. ती आपली मूलभूत जबाबदारी आहे हेही सरकार व मंत्री यांच्या गावी नसते. नरेंद्र मोदी यांच्या गाड्यांच्या ताफ्याने रुग्णवाहिकेला कशी वाट करून दिली याच्या बातम्या अधूनमधून येत असतात. हा काहीतरी मोठाच कर्तृत्वाचा प्रकार आहे असे म्हणून भाजपवाले सोशल मिडियातून त्याच्या आरत्या ओवाळत असतात. पण खरे तर हा अत्यंत मूलभूत समाजभानाचा व माणुसकीचा प्रकार आहे व तो सर्व नागरिकांनी आपसूक पाळायला हवा. अनेकदा अशिक्षित मंडळी तसे करतात. पण शहरातील सुशिक्षित म्हणवणारे व मोठमोठ्या गाड्या बाळगणारे श्रीमंत व तथाकथित सुसंस्कृत लोक मात्र ते ते करू शकत नाहीत. हा आपला आजचा भारत आहे. आरांशसारखी एखादी घटना घडली की त्याची दोन दिवस चर्चा होते. त्यावर उपाय केल्यासारखे दाखवले जाते. पण नंतर काहीच दिवसांनी पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी स्थिती होते. मंत्री व त्यांचे सायरन वाजवत जाणारे नातेवाईक कायम निसटून जातात. पण यांच्या सग्यासोयऱ्यांवर कधीतरी असा एखादा जीवघेणा प्रसंग ओढवल्याखेरीज यांची कर्तव्यबुध्दी ताळ्यावर येणार नाही असे सामान्यांना वाटत राहते.

विचार

इराण, आखात आणि भारताचा कस

लष्करी दबावाखालीही इराण सध्या वाटाघाटींची ताकद वाढवत आहे. आखाती देशांवर हल्ले करूनही ऊर्जा प्रकल्पांच्या आणि समुद्री मार्गांच्या सुरक्षेसाठी आखाती सत्तांना संवादाच्या टेबलावर आणण्यात इराण यशस्वी झाला आहे. यामुळे अमेरिकेच्या संरक्षणावरील आखाती देशांची अतिनिर्भरता उघडी पडली असून, या बदलत्या सत्तासमीकरणांमुळे भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेसमोर अभूतपूर्व आव्हाने उभी ठाकली आहेत.



प्रा. जयसिंग यादव

आखाती सहकार्य परिषदेचे (जीसीसी) सदस्य देश आज एका विचित्र आणि जटिल सामरिक कोंडीमध्ये सापडले आहेत. एकीकडे इराणचे छुपे आणि थेट हल्ले त्यांच्या सुरक्षेला सुरुंग लावत आहेत, तर दुसरीकडे त्याच हल्ल्यांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी या देशांना इराणमधील कट्टरपंथी राजवटीपुढे संवादाचा हात पुढे करावा लागत आहे. ही स्थिती केवळ लष्करी युद्धाची नसून मनोधैर्याच्या आणि भू-राजकीय दबावाच्या खेळाची आहे. आखाती देशांच्या शहरांवर, तेल शुद्धीकरण केंद्रांवर, व्यापारी बंदरांवर आणि सागरी मार्गांवर इराणकडून होणारे हल्ले हे इराणच्या लष्करी श्रेष्ठतेचे नव्हे, तर विनाशाच्या क्षमतेचे निदर्शक आहेत. इराणवर आंतरराष्ट्रीय निर्बंधांचा मोठा डोंगर आहे, त्याची अर्थव्यवस्था डबघाईला आली असून देशांतर्गत असंतोष उफाळून येत आहे, तरीही आंतरराष्ट्रीय राजकारणात इराणची किंमत कमी झालेली नाही. सामरिकदृष्ट्या दुर्बल असूनही प्रादेशिक पातळीवर स्वतःचा दबदबा कसा टिकवून ठेवायचा, याचे धडे इराण सध्याच्या संघर्षातून जगाला देत आहे. विद्ध्वंस घडवून आणण्याच्या आपल्या ताकदीचे रूपांतर राजनैतिक आणि व्यापारी सौदेबाजीत कसे करायचे, हे इराणने अचूक ओळखले आहे. आखातातील शांतता इराणच्या सुरक्षिततेशी जोडलेली नसेल, तर कोणालाही शांततेचा उपभोग घेऊ न देण्याचा इराणचा हा आक्रमक पवित्रा अखेर आखाती सत्तांना झुकायला लावत आहे. दशकांपासून आखातातील राजेशाही सत्तांचे अस्तित्व आणि सुरक्षा ही अमेरिकेच्या हमीवर टिकून होती. आखाती देशांमध्ये अमेरिकेचे भलेमोठे लष्करी तळ उभारले गेले; मात्र या व्यवस्थेतील सर्वात मोठा विरोधाभास आता उघड झाला आहे.

आखाती देश अमेरिकेचे लष्करी तळ स्वतःच्या भूमीवर बाळगून आहेत; परंतु इराण किंवा अन्य कोणत्याही शक्तीसोबतच्या युद्धात आपला देश रणमैदान बनू नये, अशी त्यांची तीव्र इच्छा आहे. त्यामुळेच आपल्या भूमीचा वापर इराणविरोधी हल्ल्यांसाठी केला जाणार नाही, अशी हमी या देशांना इराणला वारंवार द्यावी लागत आहे. अमेरिकेच्या उपस्थितीमुळे आखाती देशांचे संरक्षण होण्याऐवजी, ते स्वतःच इराणच्या निशाण्यावर आले आहेत. जोखीम आखाती देशांची आणि वर्चस्व अमेरिकेचे, अशा या समीकरणाने आखाती सत्तांचा भ्रमनिरास केला आहे. इराणचे ड्रोन आणि क्षेपणास्त्रे आखातातील संवेदनशील ऊर्जा प्रतिष्ठानांवर आदळतात, तेव्हा अमेरिकेची अत्याधुनिक क्षेपणास्त्रविरोधी यंत्रणा प्रत्येक वेळी ढालीसारखी उभी राहू शकत नाही, हे सत्य आता या सत्तांना पचवावे लागले आहे. म्हणूनच, केवळ अमेरिकेच्या सुरक्षा छत्राखाली बसून राहणे आत्मघातकी ठरेल, या निष्कर्षाप्रत संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार पोहोचले आहेत. आजच्या परिस्थितीत आखाती देशांनी इराणशी सुरू केलेला संवाद ही काही वैचारिक मैत्रीच्या किंवा इराणच्या आक्रमकतेला दिलेली मान्यता नव्हे, तर संकट व्यवस्थापनाची एक अनिवार्य बचावात्मक गरज आहे. या नव्या समीकरणांचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे ओमान आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या हालचाली. होर्मुजच्या सामुद्रधुनीतून जाणारा व्यापारी मार्ग ही जगाच्या ऊर्जेची जीवनवाहिनी आहे.

ओमानने इराणसोबत संयुक्त नौवहन कॉरिडॉर, वाहतूक व्यवस्थापन, सागरी गुप्तचर माहितीची देवाणघेवाण आणि सागरी सुरक्षा सेवांवर थेट वाटाघाटी सुरू केल्या आहेत. इतकेच नव्हे, तर समुद्रातील सुरुंग हटवण्याच्या संयुक्त प्रकल्पावरही उभय देशांमध्ये सहम ती झाली आहे. कतारची स्थितीही यापेक्षा वेगळी नाही. युद्धाच्या सुरुवातीच्या काळातच इराणने कतारच्या सर्वात महत्त्वाच्या रास लफान या महाकाय वायू केंद्राला लक्ष्य केले होते. या एका हल्ल्याने कतारच्या अर्थव्यवस्थेची नाजूक नस पकडली. आपल्या ऊर्जा प्रतिष्ठानांची भेदकता लक्षात आल्यावर कतारने सैनिकी प्रतिकाराऐवजी राजनैतिक म ार्ग चोखाळणे पसंत केले. बहरीन, ज्याचे इराणसोबतचे संबंध नेहमीच तणावाचे राहिले आहेत, तेही आता इराणशी संवाद साधण्याची भाषा करत आहे. कुवेतने तर सुरुवातीपासूनच प्रादेशिक संवादाचा पुरस्कार केला. संयुक्त अरब अमिरातीनेही पडद्यामागून इराणशी आर्थिक देवाणघेवाण आणि गुप्त राजनैतिक संवाद सुरू ठेवल्याच्या घडामोडी समोर येत आहेत. धोका जितका जवळ येईल, तितके आखाती देश इराणला आर्थिक आमिषे दाखवून किंवा गुप्त बैठका घेऊन शांत ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. ही परिस्थिती प्रादेशिक बहुलवादावर आधारलेल्या एका नव्या सुरक्षा प्रारूपाची नांदी आहे. अमेरिकेवरील अति-अवलंबित्व कमी करण्याच्या प्रयत्नात सौदी अरेबियाने पाकिस्तान आणि तुर्कियेसोबत एक त्रिपक्षीय संरक्षण करार आकाराला आणला आहे. या करारानुसार, तिन्हीपैकी कोणत्याही एका देशावर झालेला हल्ला हा सर्वांवरचा हल्ला मानला जाईल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

वरवर पाहता ही मुस्लिम जगातील मोठी लष्करी आणि राजकीय एकजूट भासत असली, तरी या कराराच्या गाभ्यात अनेक पोकळ्या आहेत. सर्वप्रथम, तुर्कियेच्या संसदेने या कराराला अद्याप कायदेशीर मंजुरी दिलेली नाही. दुसरे म्हणजे, पाकिस्तानची प्रत्यक्ष लष्करी बांधिलकी ही केवळ सौदी अरेबियातील मक्का आणि मदिना या पवित्र शहरांच्या संरक्षणापुरती मर्यादित आहे. इराणशी थेट युद्धात उतरण्याची पाकिस्तानची ना आर्थिक क्षमता आहे, ना राजकीय इच्छाशक्ती. पाकिस्तानच्या सीमेला लागून असलेला इराण हा त्याचा थेट शेजारी आहे, त्यामुळे सौदी अरेबियासाठी इराणशी पूर्ण युद्ध पुकारणे पाकिस्तानला परवडणारे नाही. असे असले तरी, मक्का करारानंतर पश्चिम आशियामध्ये पाकिस्तानला मि ळालेली नवी लष्करी आणि सुरक्षा भूमिका भारताच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील आणि चिंतेची बाब ठरत आहे. आखातातील या वेगवान भू-राजकीय पुनर्रचनेने भारताच्या धोरणात्मक स्वायत्ततेवर थेट आघात केला आहे. भारताची परराष्ट्र नीती ही पारंपरिकपणे बहुपक्षीय संतुलनावर आधारलेली होती. भारताचे एकाच वेळी इराणशी उत्तम संबंध होते. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसोबत घट्ट आर्थिक आणि धोरणात्मक भागीदारी होती, अमेरिकेशी सामरिक मैत्री होती आणि इस्रायलशी अत्यंत सलोख्याचे संबंध होते. हे भागीदार एकमेकांशी थेट युद्धात किंवा अस्तित्ववादी संघर्षात गुंतलेले नव्हते, तोपर्यंत हे संतुलन तोपर्यंत अत्यंत सुरळीत चालू शकले.

आज मात्र परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. आखाती देश आणि इराण यांच्यात तणावाचे स्फोटक वातावरण निर्माण होते, तेव्हा भारताच्या धोरणात्मक तटस्थतेला मर्यादा पडतात. भारतासाठी इराण हा मध्य आशिया आणि रशियाकडे जाणाऱ्या व्यापारी मार्गाचा दरवाजा आहे. दुसरीकडे, आखाती अरब देश हे भारताच्या ऊर्जा सुरक्षेचे मुख्य आधारस्तंभ आहेत आणि तिथे कोट्यवधी भारतीय कामगार कार्यरत आहेत, ज्यांच्याकडून भारतात येणारे परकीय चलन देशाच्या अर्थव्यवस्थेला बळ देते. या दोन परस्परविरोधी घटकांमध्ये समतोल राखणे आता पूर्वीसारखे सोपे राहिलेले नाही. भारताच्या पश्चिम आशियाई रणनीतीमध्ये इराणमधील चाबहार बंदर हे नेहमीच एक महत्त्वाचे सुरक्षा-कवच मानले गेले. पाकिस्तानच्या ग्वादर बंदराला आणि 'चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर'ला (सीपीईसी) शह देण्यासाठी भारताने चाबहारमध्ये मोठी गुंतवणूक केली. चाबहारमुळे भारताला पाकिस्तानला वळसा घालून अफगाणिस्तान आणि मध्य आशियात थेट प्रवेश मिळतो; मात्र हे बंदर जितकी भारताची ताकद आहे, तितकीच मोठी धोरणात्मक मर्यादाही बनले आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर इराणवर लादलेले कठोर निर्बंध, मध्य पूर्वेतील सततचा युद्धसदृश तणाव आणि इराणच्या देशांतर्गत धोरणांमधील अस्थिरता यामुळे चाबहार प्रकल्पाच्या वेगाला वारंवार खीळ बसत आहे. यामुळे गुंतवणुकीचा खर्च वाढत असून आंतरराष्ट्रीय व्यापारी जगतात या मार्गाची विश्वासार्हता संकटात येत आहे. भारताला आता चाबहारकडे केवळ एक हक्काचा आणि निर्वेध मार्ग म्हणून पाहून चालणार नाही, तर निर्बंधांच्या आणि संघर्षाच्या काळातही सुरू राहू शकेल, अशा एका पर्यायी व्यापारी कॉरिडॉरच्या रूपात पुनर्रचित करावे लागेल.

चर्चा आजची

वन उद्यानाकडे लक्ष द्या



चौल- भोवाळे परिसर धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे ठिकाण आहे. या ऐतिहासिक क्षेत्राची एक वेगळी ओळख जगाच्या नकाशावर कायमच आहे. मात्र चौल परिसरात असलेल्या ऐतिहासिक व पर्यटन स्थळांना उभारी देण्यास काही शासकीय यंत्रणा उदासीन ठरत असल्याचे चित्र समोर आले आहे. पर्यटन वाढीला चालना देण्यासाठी चौल- भोवाळे परिसरात जैवविविधता वन उद्यान उभारण्यात आले होते. स्थानिकांसह पर्यटकांसाठी एक आकर्षक पर्यटन स्थळ निर्माण झाले होते. फिरण्याबरोबरच निसर्गाचा आनंद घेणारे एक महत्वाचे ठिकाण बनले होते. मात्र या वन उद्यानाच्या देखभाल दुरुस्तीकडे वन विभागाने दुर्लक्ष केले. त्यामुळे हे उद्यान आता भकास झाले आहे. खेळाचे साहित्य खराब झाले असून झाडा झुडपांनी या परिसराला विळखा घातला आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांची मोठी निराशा झाली आहे. या वन उद्यानाकडे वन विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी पर्यटकांसह स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

प्रमोद जाधव

चौल हा परिसर धार्मिक, ऐतिहासिक आणि पर्यटनाच्या दृष्टीने कायमच महत्वाचा ठरत आहे. या ठिकाणी पर्यटकांची वर्दळ सतत असते. वेगवेगळे धार्मिक व ऐतिहासिक स्थळ बघण्यासाठी पर्यटक चौल परिसरात येत असतात. डिसेंबर महिन्यामध्ये दत्त जयंती निमित्त भोवाळे येथे लाखो भाविक श्रीदत्तांच्या दर्शनासाठी येताता. त्यामुळे या भागाला एक वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. पर्यटन वाढीला चालना मिळावी, वनांचे महत्व स्थानिकांना समजावे, यासाठी अलिबाग तालुक्यातील चौल-भोवाळे दरम्यान सामाजिक वनीकरण विभागामार्फत स्व. उत्तमराव पाटील जैवविविधता वन उद्यान गेल्या सात वर्षापूर्वी बांधण्यात आले. चौल - वावे मार्गावरील रस्त्याला लागूनच काही अंतरावर हे उद्यान उभारण्यात आले होते. या ठिकाणी असलेल्या ऐतिहासिक स्थळासह वनांची माहिती पर्यटकांपर्यंत पोहचविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती, फुलांची लागवड या परिसरात करण्यात आली होती. या उद्यानामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे खेळाचे साहित्य व वेगवेगळ्या प्राणी, पक्षांचे पुतळे उभारण्यात आले होते. संपूर्ण परिसर फुले आणि झाडांनी फुलून गेला होता. टेकडी भागात असलेल्या निसर्गमय परिसराचा आनंद घेण्यासाठी पर्यटक आणि स्थानिक आवर्जून पर्यटन स्थळा भेट देत होते.या उद्यानात फिरण्यासाठी येणाऱ्यांची संख्यादेखील प्रचंड वाढली. सकाळी-संध्याकाळी या उद्यानात स्थानिक फिरण्यास आवडीने येत होते. निसर्गाच्या सानिध्यात असलेल्या या उद्यानात फिरण्याचा आनंद स्थानिक व पर्यटक मनमुरादपणे घेत होते. उद्यानात फिरण्याचा एक वेगळा आनंद स्थानिकांना व पर्यटकांना मिळत होता. लहान मुलेदेखील उत्स्फुर्तने या उद्यानात बागडत होती. या उद्यानाच्या उभारणीसाठी लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला होते. मात्र गेल्या चार वर्षापासून हे उद्यान देखभाल दुरुस्तीअभावी भकास झाले आहे. पर्यटकांसह स्थानिकांचा ओघ कमी झाल्याने उद्यान बंद झाले आहे. त्यामुळे पर्यटकांसह स्थानिकांची घोर निराशा झाली आहे. उद्यानावर केलेला खर्च पाण्यात गेला आहे. या उद्यानाला गवत, झुडपाने विळखा घातला आहे. या भागात पर्यटन वाढीला चालना देण्याचा प्रयत्न वन विभागाने केला आहे. परंतू हा प्रयत्न अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे.

वन विभागाच्या अखत्यारित येणारे पर्यटन स्थळांना बळकट करण्यासाठी वन विभागाने जिल्ह्यात पावले उचलली आहेत.वेगवेगळ्या पर्यटन स्थळांचे पर्यटनाच्या दृष्टीने सुशोभीकरण करण्यासाठी वन विभागाने प्रयत्न केले आहेत. वेगवेगळ्या प्रकारची रोपांची लागवड करण्याबरोबरच प्राणी व अन्य वन्य जीवांची ओळख पर्यटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. वन विभागाची काही कामगिरी कौतूकास्पद आहे. परंतु उपक्रम राबवित असताना त्यांच्यामधील देखभाल दुरुस्ती ही कायम ठेवण्यासाठी प्रयत्न होत नसल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात वन विभागामार्फत वेगवेगळ्या प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली आहे.मात्र त्या रोपांचे जतन होत नसल्याचे अनेकवेळा दिसून आले आहे. चौल- भोवाळे परिसरात आठ वर्षापुर्वी उभारण्यात आलेल्या वन उद्यानाची देखभाल दुरुस्ती करून ते उद्यान पर्यटकांसाठी खुले करावे अशी मागणी जोर धरत आहे. अलिबागचे नवे वन परिक्षेत्र अधिकारी यांनी पर्यटन वाढीसाठी पुढाकार घेऊन वन उद्यानाला नवसंजीवनी देण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी नागरिकांसह पर्यटकांकडून होत आहे. या मागणीची दखल त्यांनी घेऊन चौल- भोवाळे येथील वन उद्यान पुन्हा नव्याने सुरू करण्याचा प्रयत्न करावा असे ही बोलले जात आहे. सकाळ व संध्याकाळी पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचे असलेले ठिकाण भकास न ठेवता, ते अधिक सुंदर बनविण्याचा प्रयत्न केल्यास वन जागेत पर्यटन वाढीला खऱ्या अर्थाने चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

लोकसंसद

लहान मुलांसाठी लिफ्ट सुरक्षेचे नवे नियम स्वागतार्ह!

सध्याच्या अनेक मजली इमारतीच्या जम ान्यात लिफ्ट (उद्वाहक) ही एक अत्यावश्यक बाब बनली असून मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर इत्यादी महानगरातील उंच इमारती आणि गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये लिफ्टचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मात्र यासोबतच लहान मुलांच्या लिफ्टमधील अपघातांच्या घटनाही चिंताजनक रीतीने वाढत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता यापुढे १२ वर्षांखालील मुलांना एकट्याने लिफ्ट वापरण्यास बंदी घालण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. १ नोव्हेंबर २०२६ पासून मुंबई, पुणे, नागपूरसह संपूर्ण राज्यभरात 'महाराष्ट्र लिफ्ट्स, एस्कलेटर आणि मूव्हिंग वॉकवेज नियम, २०२६' अंतर्गत तो लागू करण्यात आला आहे. यासोबतच सर्व लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे, स्वयंचलित बचाव उपकरण आणि ओव्हरलोड संरक्षण उपकरण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. लहान मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने स्वागतार्ह असलेला हा नियम जागृत नागरिक आणि सोसायट्यांनी सतर्क राहून तसेच पालकांनी आपल्या १२ वर्षांखालील मुलांना या नियमाचे गांभीर्य समजावून सांगितल्यास खऱ्या अर्थाने यशस्वी होईल. कारण केवळ कायदा करून चालणार नाही, तर त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे तितकेच गरजेचे आहे. त्यासाठी गृहनिर्माण संस्थांनी इमारतीतील सुरक्षारक्षक व सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे यावर काटेकोर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

क्रांतिकारकांची स्फूर्तिदेवता राणी लक्ष्मीबाई

राणी लक्ष्मीबाई ही केवळ एक महान वीरांगना नाही तर त्या सर्व महिलांसाठी आदर्श आहेत. देशाच्या पहिल्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या राणी लक्ष्मीबाईंच्या शौर्याने आश्चर्यचकित होऊन इंग्रजांनी त्यांचे कौतुक केले होते, असे सांगितले जाते.

राणी लक्ष्मीबाई यांचा जन्म १९ नोव्हेंबर १८२८ रोजी काशीतील वाराणसी येथील अस्सीघाट येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव मोरोपंत तांबे आणि आईचे नाव भागीरथीबाई होते. त्यांचे बालपणीचे नाव ममणिकर्णिकाफ होते, पण मणिकर्णिकाला प्रेमाने ममनुफ म्हणत. मनू अवघ्या चार वर्षांची असताना तिची आई वारली. त्यानंतर मग मोरोपंत मनूसोबत झाशीला गेले. राणी लक्ष्म ीबाईंनी त्यांचे बालपण आजोबांच्या घरी घालवले. जेथे त्यांना छबिली म्हणूनही ओळखले जात होते. १२ वर्षांची असताना त्यांचा विवाह झाशीचे राजे गंगाधर राव यांच्याशी झाला. लग्नानंतर मनुचे नाव लक्ष्मीबाई ठेवण्यात आले. राणी लक्ष्मीबाई यांच्या लग्नानंतर त्यांच्या झाशी या राज्याची आर्थिक स्थिती म ोठ्या प्रमाणात सुधारली.राणी लक्ष्मीबाई या समीकरण आणि शस्त्रास्त्रांमध्ये अत्यंत कुशल होत्या. त्यांनी झाशीच्या किल्ल्याच्या एक महिला सैन्य उभे केले होते. त्या स्वतः मर्दानी पोशाख परिधान करुन फेरफटका मारत असत. हे सर्व पाहून त्यांचे पती राजा गंगाधररावांना खूप कौतुक वाटे. पुढे काही काळानंतर राणी लक्ष्मीबाई गरोदर राहिल्या त्यांनी मुलाला जन्म दिला. पण काही महिन्यांनी ते बाळ मरण पावले.आपल्या राजगादीचा वारस असा लहानपणीच निर्मित्याने हिरावून घेतला. यामुळे संकटांचा डोंगर गंगाधररावांवर कोसळला. आणि दुःखी झालेल्या गंगाधररावांनी २१ नोव्हेंबर १८५३ रोजी आपले प्राण सोडले. राजांच्या जाण्यामुळे झाशी दुःखात बुडाली आणि याचवेळी इंग्रजांनी त्यांच्या कुटील धोरणाचा अवलंब करुन झाशीवर हल्ला केला. यावेळी मग राणी लक्ष्मीबाई यांनी तोफांशी लढण्याची रणनीती आखून आपल्या विश्वासू लोकांना तोफखान्याचे नेतृत्व करण्यासाठी पाठवले. शत्रूचा पराभव करण्यासाठी गडावरील कडक बिजली, घनगर्जन, भवानीशंकर इत्यादी तोफांचा वापर केला.

लक्ष्मीबाईंची तटबंदी पाहून ब्रिटीश सेनापती हुरोज थक्क झाला. राणी रणचंडीचे खरे रूप धारण करून ती आपला दत्तक पुत्र दामोदरराव यांना पाठीवर घेऊन भयंकर युद्ध लढत राहिली. या लढाईत झलकारीबाई आणि मुंदर सखींनीही रणांगणात आपले मोठे कौशल्य दाखवले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक महिला क्रांतिकारी होऊन गेल्या ज्यांनी मायभूमीसाठी त्यांच्या प्राणाची आहूती वाहिली. त्या पैकी एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावशाली व्यक्तीमत्त्व म्हणजे झाशीची राणी लक्ष्मीबाई. मणिकर्णिका अर्थात लक्ष्मीबाई यांनी इंग्रजापुढे न झुकता स्वातंत्र आणि स्वाभिमानाचा लढा दिला. झाशीची गादी सांभाळून नेतृत्व करणाऱ्या झाशीची राणी या आजही सर्वांसाठी एक आदर्श आहेत. १६ जून १८५८ रोजी ग्वाल्हेरजवळील कोट्याच्या लढाईत राणी लक्ष्मीबाईंनी शेवटपर्यंत लढा दिला. आजच्या दिवशी १८५८ साली त्यांचा रणांगणातच त्यांना वीरमरण आले. राणी लक्ष्मीबाईंनी बालपणीच सिद्ध केले की त्या एक उत्तम सेनापतीच नाही तर एक कार्यक्षम प्रशासकही आहे. त्या म हिला सक्षमीकरणाच्या बाजूनेही होत्या. त्यांनी आपल्या सैन्यात महिलांची भरती केली होती. आज काही लोक जे स्वत:ला महिला सशक्तीकरणाचे नेते म्हणवतात ते महिलांना सैन्यात पाठवण्याच्या विरोधातही आहेत.पण या सगळ्यासाठी राणी लक्ष्मीबाई हे उत्तम उदाहरण आहे. की महिलांची इच्छा असेल तर त्या कोणतेही पद मिळवू शकतात.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१९ नोव्हेंबर

१) श्रीम.निर्मला मनोहर घरत
पिंपळभाट, अलिबाग
दि. १९-११-१९५४
२)श्रीम.अनुजा राजेंद्र पाटील
अलिबाग दि.१९-११-२०१३

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते



कै. नरहरी विश्वनाथ रानवडे, स्मरणार्थ अलिबाग

दहा वर्षांनंतरही पाण्यासाठी वणवण

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेची स्थापना होऊन दहा वर्षांचा कालावधी उलटला असतानाही महापालिका क्षेत्रातील अनेक ग्रामीण गावांना अद्याप नियमित आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी आजही बोअरवेल आणि विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, पनवेलचे सभापती देवेंद्र गंगाराम मधवी यांनी महापालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले आहे.

पनवेल महानगरपालिकेची स्थापना २०१६ मध्ये झाली. मात्र, दहा वर्षांनंतरही प्रभाग क्रमांक १ मधील अनेक गावांसह महापालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामीण गावांना नियमित



पाणीपुरवठा होत नसल्याबद्दल निवेदनात नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. यापूर्वी ११ जानेवारी २०२२ रोजीही नागरिकांच्या पाणीसमस्येबाबत प्रशासनाकडे लक्ष वेधण्यात आले होते. गावांमधील नागरिकांना बोअरवेलचे पाणी वापरण्याची वेळ येत असून, हे पाणी पिण्यास अयोग्य असल्याने नागरिकांना बोअरवेल आटल्यावर विकतचे पाणी घ्यावे लागत आहे. विशेष म्हणजे, महापालिकेकडून नियमित पाणीपुरवठा होत नसतानाही नागरिकांकडून कर आकारला जात असल्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ डब्ल्यू अन्वये बाराव्या अनुसूचीतील विषयांमध्ये घरगुती पाणीपुरवठ्याची जबाबदारी नमूद असल्याचा संदर्भ देत ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवणे योग्य नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित गावांसाठी कोणत्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नियोजन करण्यात आले आहे, योजनेसाठी किती निधी मंजूर झाला आणि किती खर्च झाला, काम कोणत्या टप्प्यावर आहे, किती काम पूर्ण झाले व किती प्रलंबित आहे, गावांना नियमित पाणीपुरवठा नेमका कोणत्या तारखेपासून सुरू होणार आहे, तसेच तोपर्यंत पर्यायी पाणीपुरवठ्याची काय व्यवस्था करण्यात येणार आहे, अशी पाच महत्त्वपूर्ण माहिती मागविण्यात आली आहे.

महापालिकेने या सर्व प्रश्नांची अधिकृत लेखी उत्तरे देऊन पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी निश्चित कालमर्यादेसह कृती आराखडा द्यावा, अशी मागणी

- **नियमित पाणीपुरवठ्याबाबत देवेंद्र मधवी यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन**
- **योजनेचा मागितला सविस्तर लेखाजोखा**

करण्यात आली आहे.

महापालिकेच्या स्थापनेला दशक पूर्ण होत असताना ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत सुविधेसाठी आणखी किती वर्षे प्रतीक्षा करावी लागणार, असा सवाल या निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे. या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशासनाने ठोस कार्यवाही करावी, अशी अपेक्षा निवेदनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

मुलाकडून आईवर धारदार शस्त्राने वार

नवी मुंबई : कौटुंबिक तणावातून पोटच्या मुलानेच आपल्या ७० वर्षीय आईच्या गळ्यावर आणि हातावर धारदार शस्त्राने वार केल्याची घटना वाशी येथे घडली आहे. दरम्यान यानंतर माथेफिरू मुलानेही स्वतःच्या गळ्यावर वार करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या घटनेत मायलेक दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघांचीही प्रकृती चिंताजनक असून ते मृत्यूशी झुंज देत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. हिरावती घोडाम (७०) असे जखमी आईचे नाव तर विनय घोडाम (४२) असे मुलाचे नाव आहे. सोमवारी सकाळी दहाच्या सुमारास पूजा पंजाब हॉटेलजवळ शिळ-महापे रस्त्यावरील परिसरात विनय याने कौटुंबिक ताणतणावातून आई हिरावती यांच्या गळ्यावर आणि हातावर धारदार शस्त्राने वार केले. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या. त्यानंतर विनय याने वाशी परिसरात जाऊन स्वतःच्या गळ्यावर वार करीत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला.

पोलीस आयुक्तांचे व्हॉटसॲप हॅक

ठाणे : ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे व्हॉट्सअप सायबर भामट्यांनी हॅक केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या भामट्यांनी डुंबरे यांच्या व्हॉट्सअप स्टेटसवर सुमारे २० अश्लील व्हिडीओ अपलोड केल्याचे आढळून आले. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वसामान्यांचे व्हॉट्सअप हॅक झाल्याच्या घटना यापूर्वी अनेकदा घडल्या आहेत. परंतु खुद्द ठाणे पोलीस आयुक्तांचेच व्हॉट्सअप हॅक झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

वृद्ध महिलेचा अपघातात मृत्यू

कल्याण : कल्याण राज्यमार्गावरील अपघातांची मालिका सुरूच असून आता या मार्गावरील गतिरोधक धोकादायक ठरत आहेत. गतिरोधकांवर रेडियम किंवा पांढरे पट्टे नसल्याने रात्रीच्या वेळी ते वाहनचालकांना दिसत नसल्याने अपघातात वाढ झाली आहे. अशाच एका गतिरोधकावर दुचाकी आदळल्याने मागे बसलेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. मरियम कर्जिकर असे मृत महिलेचे नाव आहे. नेरळजवळील सीएनजी पंप परिसरात रविवारी रात्रीच्या सुमारास हा अपघात घडला.

खोपोली हाळ येथील मरियम कर्जिकर (६१) या पतीसोबत दुचाकीवरून नेरळ दामत येथे लग्नसमारंभासाठी जात होत्या. दरम्यान, रविवारी रात्री आठच्या सुमारास त्यांची दुचाकी सीएनजी पंपाजवळील गतिरोधकावर जोरात आदळली. अंधारामुळे गतिरोधक न दिसल्याने दुचाकी उंच उडाली आणि मागे बसलेल्या मरियम यांचा तोल जाऊन त्या रस्त्यावर कोसळल्या. यात ज्या गंभीर जखमी झाल्या. त्यांच्या कानातून रक्तस्राव सुरू झाल्याने त्यांना तातडीने भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

कशेडी घाटातील रस्त्याच्या दुरूस्तीचे काम पूर्ण

| खेड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील जुन्या कशेडी घाटातील भोगाव हद्दीतील गेल्या २० वर्षांपासून सातत्याने खचणाऱ्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम अखेर पूर्ण झाले आहे. ठेकेदार कंपनीने १०५ मीटर लांबीच्या धोकादायक भागात गॅबियन तंत्राचा वापर करून संरक्षक भिंत उभारण्यासह रस्त्याचे मजबुतीकरण केले आहे. त्यामुळे या 'डेंजर झोन'चा धोका कमी होण्याची अपेक्षा आहे. मात्र, कामाची खरी कसोटी आगामी पावसाळ्यात लागणार आहे.

२००५ मध्ये मोरीच्या कामासाठी केलेल्या ब्लास्टिंगनंतर या ठिकाणी रस्ता खचण्यास सुरुवात झाली होती. दरवर्षी लाखो रुपये खर्चून दुरूस्ती केली जात असली तरी पावसाळ्यात पुन्हा रस्ता खचत होता. त्यामुळे हा परिसर 'डेंजर झोन' म्हणून ओळखला जाऊ लागला. या मार्गावरून पळचिल विभागातील १२ गावे आणि २८ वाड्यांमधील नागरिकांची वाहतूक होत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.

पावसाळा आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे कामात अडथळे आल्याने कंपनीने सुरुवातीला तात्पुरता पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला होता. अखेर ठेकेदार कंपनीने या ठिकाणी खोल जमिनीत काँक्रिटीकरण करून रस्त्याचा पाया मजबूत केला.



- **'डेंजर झोन'चा धोका कमी होण्याची अपेक्षा**

दरीच्या बाजूला सुमारे १०५ मीटर लांब आणि १५ फूट उंच गेल्व्हनाइज्ड स्टीलच्या जाळीत दगड भरून गॅबियन पद्धतीची संरक्षक भिंत उभारली आहे. तसेच डोंगरभागातून झिरपणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार व्यवस्थाही करण्यात आली आहे. टिकाऊ बांधकाम साहित्याचा वापर करून रस्त्याचे मजबुतीकरण केल्याची माहिती ठेकेदार कंपनीचे अमित चंदनानी यांनी दिली. परंतु, दुरूस्तीचे काम पूर्ण झाले असले तरी या धोकादायक भागात दुपदरी रस्ता अचानक एकपदरी होत असल्याने अपघाताची शक्यता कायम आहे. घाटातील तीव्र वळण आणि उतारामुळे वाहनचालकांना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. २००५ पासून सातत्याने खचणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

महामार्गावर धुक्याची चादर

कोलाड : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वर पहाटेच्या वेळी दाट धुके पसरत आहे. यामुळे या महामार्गावरील वाटाच हरवल्या असल्याचे दिसून येत आहे. धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे व रस्त्यावर धुक्याची चादर पसरल्यामुळे वाहन चालकांना सकाळी लाईट लावून वाहने धिम्या गतीने वाहने हाकावी लागत आहेत. पहाटेपासून सकाळी साडेनऊ वाजेपर्यंत रस्त्यावर धुके पसरल्याचे दिसून येत आहे. मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांना आल्हादायक थंडीमुळे वेगळाच आनंद मिळत आहे. तर या थंडीचा आणि धुक्याचा आंबा व काजूच्या मोहरासाठी चांगले मानला जातो.

मालमत्ता कर वसुलीसाठी डिजिटल माध्यमांचा वापर

| मुंबई | प्रतिनिधी |

मालमत्ता कराची थकबाकी वसूल करण्यासाठी मुंबई महापालिका आता डिजिटल माध्यमांचा वापर करणार आहे. मालमत्ताधारकांना कर भरण्याची सूचना, थकबाकीची माहिती आणि वेळोवेळी स्मरणपत्रे पाठविण्यासाठी व्हॉट्सअप बिझनेस आणि गुगल मेसेजेस प्रणालीचा आधार घेतला जाणार आहे. यासाठी तीन वर्षांच्या कालावधीसाठी २ कोटी ३ लाख ३ हजार ५२९ रुपयांचे कंत्राट देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने तयार केला आहे. येत्या २० नोव्हेंबरला होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावावर मंजुरीसाठी चर्चा होणार आहे.

महापालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागामार्फत ही डिजिटल संदेशप्रणाली राबविण्यात



येणार आहे. या माध्यमातून मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची देय रक्कम, थकबाकी आणि कर भरण्याच्या मुदतीबाबत थेट संदेश पाठविण्यात येतील. त्यामुळे करदात्यांपर्यंत वेळेत माहिती पोहोचविण्यासोबतच करवसुलीची प्रक्रिया अधिक गतिमान करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. या कामासाठी केंद्र सरकारच्या 'जीईएम पोर्टल'वर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यात आर्थिक निविदेत विदर्भ इन्फोटेकने सर्वात कमी दर सादर केल्याने या कंपनीला कंत्राट देण्याची शिफारस करण्यात आली आहे.

प्रस्तावानुसार तीन वर्षांत एक कोटी ३४ लाखांहून अधिक संदेश पाठविण्याचे नियोजन आहे. प्रत्येक संदेशासाठी ३५ पैसे आणि त्यावर १८ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे. प्रणाली विकसित करणे, संदेश पाठविणे, तांत्रिक मदत आणि तीन वर्षे देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी कंत्राटदारावर राहणार आहे. कार्यादेश मिळाल्यानंतर ३० दिवसांत प्रणाली कार्यान्वित करणे बंधनकारक असेल. निर्धारित वेळेत काम पूर्ण न केल्यास दंडाची तरतूदही करण्यात आली आहे.

श्रीवर्धनमध्ये आंबा बागांना अनुकूल वातावरण

बागायतदारांच्या आशा पल्लवित

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

यंदाच्या हंगामात अनियमित पावसामुळे शेतकरी वर्गाला भातशेतीचे नुकसान सहन करावे लागले. श्रीवर्धन तालुक्यातील बागायतदारांना आता आंबा बागांकडून मोठी अपेक्षा आहे. सध्या तालुक्यात रात्री हवेत गारवा आणि दिवसा गरमा अशी हवामानाची रचना तयार झाली असून, हा बदल आंबा बागांसाठी पोषक ठरत आहे.

पावसाच्या लहरीपणामुळे या आधी बागायतदारांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मधल्या काळात



झालेल्या अवकाळी सरींमुळे थंडी कमी होऊन झाडांना कोवळी पालवी फुटल्याने हंगाम लांबणीवर पडेल, अशी धास्ती व्यक्त केली जात होती. मात्र, आता रात्रीच्या गारव्यामुळे आणि दिवसाच्या उष्णतेमुळे झाडांवर पोषक ताण निर्माण होत आहे. या स्थितीमुळे आंबा बागांना लवकरच मोहोर फुटण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

भातशेतीतून अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने होणारी तूट भरून काढण्यासाठी बागायतदारांनी आंबा बागांची विशेष मशागत सुरू केली आहे. स्वच्छता, खत व्यवस्थापन आणि आवश्यक त्या उपाययोजनांवर भर देत शेतकरी हंगामाची तयारी करत आहेत. याशिवाय, उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि स्थानिक पातळीवर पाणी अडवण्याच्या प्रयत्नांमुळे विहिरी व पाणवठ्यांच्या पातळीत काही प्रमाणात दिलासा मिळत असल्याचे चित्र आहे.

याबाबत बोलताना श्रीवर्धन येथील आंबा बागायतदार वैभव कर्णेकर म्हणाले, की सध्या रात्री हवेत गारवा आणि दिवसा गरमा असे वातावरण असल्याने झाडांना चांगला ताण मिळत आहे. हेच वातावरण पुढे काही दिवस टिकून राहिले, तर आंबा बागांना दर्जेदार मोहोर येईल आणि यंदाचा हंगाम सावरण्यास मदत होईल.

शेतकऱ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य द्यावे | मदत व पुनर्वसन विभागाचे आवाहन

शासकीय योजनांसाठी फार्मर आयडी गरजेचे

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य विभागांच्या योजनांचा लाभ थेट मिळावा, यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणालीतील माहिती अद्ययावत असणे आवश्यक आहे. या प्रणालीच्या माध्यमातून कृषी व अन्य विभागांच्या विविध योजनांची मदत शेतकऱ्यांपर्यंत सातत्याने पोहोचविण्यात येत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया तातडीने पूर्ण करून फार्मर आयडी प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



शासनाच्या विविध योजनांमधून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य, अनुदान व अन्य लाभ देण्यात येतात. यापूर्वीही शासनाने विविध संकटांच्या काळात शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून दिली आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी व फार्मर आयडीचे महत्त्व अधिक वाढले आहे. पात्र शेतकऱ्यांना मदतीची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी व पडताळणी प्रक्रिया पूर्ण असणे गरजेचे आहे. ॲग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित व अद्ययावत करण्यात येत असून, विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी ही माहिती उपयुक्त ठरत आहे. शेतकऱ्यांनी ई-केवायसी तसेच फार्मर आयडीची प्रक्रिया पूर्ण केल्यास योजनांचा लाभ मिळण्यातील अडचणी कमी होण्यास मदत होणार आहे.

ई-केवायसी किंवा फार्मर आयडी तयार करताना शेतकऱ्यांना काही तांत्रिक अथवा अन्य अडचणी येत असल्यास राज्य शासनामार्फत त्या सोडविण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल. शेतकऱ्यांनी कोणत्याही अडचणीमुळे प्रक्रिया अपूर्ण ठेवू नये. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून आपली माहिती अद्ययावत करावी व आवश्यक पडताळणी पूर्ण करावी. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पोहोचावा, यासाठी ई-केवायसी व फार्मर आयडी पूर्ण करणे महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करण्यासाठी जवळच्या सीएससी (नागरी सुविधा केंद्र) येथे आधार कार्ड व आधारशी संलग्न मोबाईल क्रमांकासह जाऊन फार्मर आयडी तयार करून घ्यावा. राज्यातील शेतकऱ्यांनी या प्रक्रियेला प्राधान्य देऊन तातडीने पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाने केले आहे.

निवडक



कशेळी डेपोमध्ये पहिल्या मेट्रो ट्रेनचे आगमन

मुंबई : ठाणे-भिवंडी-कल्याण परिसरातील मेट्रो प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुंबई मेट्रो मार्गिका ५ अर्थात ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पार झाला आहे. एमएमआरडीएच्या कशेळी डेपोमध्ये पहिल्या मेट्रो ट्रेनचे आगमन झाले आहे. त्यामुळे ही मेट्रो मार्गिका प्रवासी सेवेसाठी सज्ज होण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे गेली आहे. मेट्रो ट्रेनच्या आगमनामुळे डेपोमधील तपासणी, चाचणी आणि देखभालीच्या प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले आहे. ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो मार्गिकेसाठी कशेळी डेपो अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. मेट्रो गाड्या उभ्या करणे, त्यांची नियमित तपासणी करणे, चाचण्या घेणे आणि आवश्यक देखभाल करणे ही कामे या डेपोमधून केली जाणार आहेत. डेपोचे बांधकाम सुरू असतानाच मेट्रो ट्रेनच्या आगमनासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या सुविधा उभारण्यात आल्या आहेत. यामध्ये कोच लोडिंग आणि अनलोडिंग प्लॅटफॉर्म तसेच तात्पुरत्या तपासणी सुविधेचा समावेश आहे. या सुविधा पूर्ण झाल्यामुळे मेट्रो गाड्यांचे आगमन आणि प्राथमिक तपासणी करण्यासाठी आवश्यक व्यवस्था उपलब्ध झाली आहे.

गणित संबोध परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश

खरोशी : रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे आयोजित गणित संबोध परीक्षा २०२६ च्या जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत श्रीमती सुमतीबाई विनायक देव माध्यमिक विद्यालय, पेण-रायगड या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवत जिल्हास्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे. इयत्ता पाचवीच्या जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत श्रीमयी तुकाराम बर्गे, स्वरूप विश्वनाथ ठाकूर, लाभ राजेश कोठेकर आणि कैवल्य शरद उदार यांनी प्रथम क्रमांकाचे मानांकन प्राप्त केले. माही हसूराम म्हात्रे आणि अद्विका अवधूत कोळी यांनी द्वितीय क्रमांकाचे मानांकन, तर स्वयम विनोद शिवकर आणि मायरा रोशन ठाकूर यांनी तृतीय क्रमांकाचे मानांकन मिळविले. इयत्ता आठवीच्या गुणवत्ता यादीत हर्षिता तुकाराम बर्गे हिने प्रथम क्रमांक, पियुष नितीन मोकल याने द्वितीय क्रमांक, तर प्रथम शामकांत पाटील याने तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाच्या यशात भर घातली. या विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांची मेहनत, सातत्य, गणित विषयाची आवड तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. श्रीमती सुमतीबाई विनायक देव माध्यमिक विद्यालय, पेण-रायगड येथील विद्यार्थ्यांनी गणित विषयातील आपल्या गुणवत्तेची जिल्हास्तरावर छाप उमटविल्याने विद्यालयाच्या शैक्षणिक क्षेत्रातील नावलौकिकात भर पडली आहे.

'युरोपियन पांढरा करकोचा' पक्षी रत्नागिरीत दाखल

रत्नागिरी : हजारो किलोमीटरचा प्रवास करीत युरोपातून आलेल्या अत्यंत दुर्मीळ युरोपियन पांढऱ्या करकोचा या पक्ष्याने यंदा रत्नागिरीत हजेरी लावली आहे. रत्नागिरी तालुक्यात या पक्ष्याची प्रथमच नोंद झाल्याने पक्षी अभ्यासक आणि निसर्गप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. शहरातील



चंपक मैदानावर गेल्या चार दिवसांपासून या परदेशी पाहुण्याचा मुक्काम असून, त्याचे दर्शन घेण्यासाठी पक्षीप्रेमींची गर्दी होत आहे. युरोप, मध्य आशिया आणि पश्चिम आशिया हा या पक्ष्याचा मूळ अधिवास आहे. तेथील कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी हा पक्षी दरवर्षी हजारो किलोमीटरचे अंतर पार करून नोव्हेंबर महिन्यात भारतीय उपखंडात स्थलांतर करतो. हिवाळा संपल्यानंतर फेब्रुवारी ते मार्चदरम्यान पुन्हा आपल्या मूळ अधिवासाकडे परतीचा प्रवास सुरू करतो. निसर्गातील या स्थलांतराचा अद्भुत प्रवास रत्नागिरीकरांना प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली आहे.

कळंबोलीत भटक्या श्वानाची दहशत

पनवेल : कळंबोली वसाहतीमध्ये एका भटक्या श्वानाने अक्षरशः धुमाकूळ घालत २१ नागरिकांना चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. रविवारी रात्री घडलेल्या या घटनेत एकाच श्वानाने नागरिकांवर हल्ले करून त्यांचे लचके तोडले. या हल्ल्यामुळे परिसरातील रस्त्यांवर रक्ताचे सडे पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. घटनेतील जखमींवर पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात उपचार करण्यात आले. विशेष म्हणजे, या घटनेची सोमवारी महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडे नोंद करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री एका भटक्या श्वानाने कळंबोली वसाहतीतील नागरिकांवर हल्ले केले. या हल्ल्यात तब्बल २१ जणांना श्वानाने चावा घेतला. एकाच श्वानाने वेगवेगळ्या ठिकाणी नागरिकांवर हल्ले केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अचानक झालेल्या या हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. श्वानाच्या हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांना उपचारासाठी पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथे जखमींवर आवश्यक वैद्यकीय उपचार करण्यात आले. या घटनेची अधिकृत नोंद सोमवारी वैद्यकीय आरोग्य विभागाकडे झाल्यानंतर भटक्या श्वानांच्या उपद्रवाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

वृद्ध नागरिकाची फसवणूक

उरण : वहाळ गावाच्या प्रवेशद्वाराजवळ बसलेल्या एका ८१ वर्षीय वृद्धाची हातचलाखीने दिशाभूल करून अज्ञाताने सव्वा लाखांहून अधिक किमतीचे सोन्याचे दागिने लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नारायण माया घरत (वय ८१, रा. वहाळ गाव) हे सोमवारी (दि.१६) दुपारच्या सुमारास गावातील स्व. बाळकृष्ण काशीनाथ घरत प्रवेशद्वाराच्या कमानीजवळ बसण्यासाठी गेले होते. तिथे अंदाजे ४० ते ४५ वयाचा एक अनोळखी व्यक्ती त्यांच्याजवळ आला आणि त्यांना बाजूला घेऊन गेला. त्याने वृद्धाकडे गळ्यातील सोन्याची चैन आणि हातातील अंगठी पाहण्यासाठी मागितली. नारायण घरत यांनी आपली सोन्याची चैन व हातातील अंगठी काढून त्या इसमाच्या हातात दिली. त्या चोराने ती चैन व अंगठी एका कागदात ठेवून त्याची पुडी बांधली आणि हातचलाखी करून खिशातील दुसरी बनावट पुडी वृद्ध नागरिकाच्या हातात दिली. त्यानंतर वृद्ध घरी परतले. त्यांच्या सुनेने ती पुडी पाहिली असता त्यामध्ये सोन्याची नसून एक खोटी चैन असल्याचे निष्पन्न झाले. तसेच वृद्धाच्या हातावरील अंगठीही गायब होती. याप्रकरणी उलवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाहतूक कोंडीतून कळंबोली सर्कलची होणार सुटका?

- उड्डाणपुलाचे काम युद्धपातळीवर सुरु
- मुंबई-पुणे, विमानतळाचा प्रवास होणार जलद

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल आणि नवी मुंबईतील वाहतुकीचा सर्वाधिक ताण असलेल्या कळंबोली सर्कलवरील वाहतूककोंडी दूर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या उड्डाणपुलाच्या कामाला वेग आला आहे. विविध यंत्रसामग्रीच्या साहाय्याने बांधकाम युद्धपातळीवर सुरू असून, या प्रकल्पाच्या पूर्णत्वाकडे वाहनचालकांचे लक्ष लागले आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील विद्यमान उड्डाणपुलाच्या वरून नव्या पुलाची जोडणी होणार असल्याने या परिसरातील वाहतूक व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल अपेक्षित आहेत.

कळंबोली सर्कल हे मुंबई, पुणे, ठाणे, पनवेल, जेएनपीए आणि गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या वाहनांसाठी महत्त्वाचे जंक्शन आहे.



दररोज हजारो कंटेनर, अवजड ट्रक, खासगी वाहने आणि एसटी बसची या मार्गावरून वर्दळ असते. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, जेएनपीए मार्ग आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणारी वाहने याच परिसरातून मार्गक्रमण करतात. त्यामुळे विशेषतः सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी येथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. अनेकदा काही किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठीही वाहनचालकांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागते.


नव्या उड्डाणपुलामुळे विविध महत्त्वाच्या मार्गांवरील वाहतुकीला अधिक सुलभ जोडणी मिळण्याची अपेक्षा आहे. जेएनपीए बंदराकडे जाणाऱ्या अवजड वाहनांसह विमानतळाकडे जाणारे प्रवासी आणि मुंबई-गोवा महामार्गावरील वाहनचालकांसाठी हा पूल उपयुक्त ठरणार आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील पुलाच्या वरून होणारी जोडणी हे या प्रकल्पाचे वैशिष्ट्य मानले जात आहे. सध्या कळंबोली सर्कलवर अनेक दिशांनी येणाऱ्या वाहनांची एकाच ठिकाणी गर्दी होत असल्याने वाहतुकीचा वेग मंदावतो. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल आणि परिसरातील वाहतुकीत भविष्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

त्याचबरोबर जेएनपीए बंदरातील अवजड वाहनांची वर्दळ आणि मुंबई-गोवा महामार्गावरील वाहतूक लक्षात घेता कळंबोली सर्कलवरील हा उड्डाणपूल महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. त्यामुळे कामाचा वेग कायम ठेवून सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजनांसह हा प्रकल्प लवकर पूर्ण करावा, अशी अपेक्षा वाहनचालक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

प्रवासाचा वेळ वाचणार

नव्या पुलामुळे वाहनांना अधिक सुलभ मार्ग उपलब्ध झाल्यास सर्कलवरील वाहतुकीचा ताण विभागला जाण्यास मदत होईल. परिणामी, प्रवासाचा वेळ आणि इंधनाची बचत होण्याची शक्यता आहे. विशेषतः जेएनपीए बंदरातील कंटेनर वाहतूक आणि विमानतळाकडे जाणाऱ्या प्रवाशांना याचा फायदा होऊ शकतो.

निवडक



कोमनादेवी पार्कवर स्वच्छता मोहीम

उरण : केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांच्या मार्गदर्शनाखाली सारडे गावातील कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे एक स्तुत्य उपक्रम राबवीत एक आदर्श निर्माण केला. सर्व मंडळींच्या माध्यमातून व मेहनतीतून कोमनादेवी ऑक्सिजन पार्क येथे लागवड केलेल्या शेकडो झाडांच्या सभोवताली वाढलेल्या गवताची साफसफाई करण्यासाठी तब्बल ५ पाच ग्रास कटर मशीन्सचा वापर करण्यात आला. कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचा संपूर्ण परिसर आणि डोंगर माथ्यावर झाडांच्या बाजूला वाढलेले भयंकर प्रकारचे गवत ग्रास कटर मशीन्सच्या सहाय्याने कापून झाडांच्या आजुबाजुचा परिसर साफ करण्यात आला. कोमनादेवी ऑक्सिजन पार्क आणि त्याच वनराईतील झाडांभोवती वाढलेल्या गवताची साफसफाई करण्यासाठी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांनी आपल्या स्व खर्चातून तीन रोजंदारीवरचे कामगार त्यांच्या मजुरी आणि ५ पाच ग्रास कटर मशीन्स दिले. संपूर्ण कोमनादेवी ऑक्सिजन पार्कचा परिसर आणि डोंगर माथ्यावरील गवताची साफसफाई करण्यात आली. त्याचसोबत तीन आठ फुटी उंच अशा वटवृक्षांचीदेखील लागवड करण्यात आली.



मुरूडमध्ये पार्किंग समस्येवर बैठक

आगरदांडा : मुरुड शहरातील पार्किंगच्या समस्येवर कायम स्वरूपी तोडगा काढण्यासाठी मुरुड नगरपरिषदेत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव तसेच पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे आणि सचिन पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील वाहतूक व पार्किंग व्यवस्थेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पार्किंग समस्येवर प्रभावी नियंत्रण मिळवून नागरिक व पर्यटकांना दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजनांवर बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. यामध्ये पुरकर नाका येथे वन-वेचे फलक लावणे, पुरकर नाका ते मशीद परिसरादरम्यान मालवाहतुकीचे नियोजन करणे, पुरकर नाका भाजी मार्केटची जागा पार्किंगसाठी उपलब्ध करून देणे, रॉयल स्वीट मार्ट ते कल्याणी हॉस्पिटलपर्यंत पी-१ व पी-२ पार्किंग व्यवस्था लागू करणे, कर्णिक बंगला ते केणे पाखाडी परिसरात पार्किंग झोन तयार करणे, नाझरे गल्ली येथे नो पार्किंग झोन निश्चित करणे तसेच मच्छी मार्केट परिसरात पार्किंगची व्यवस्था करण्याबाबत चर्चा झाली.मुरुड मार्केटमध्ये नव्याने पार्किंगची जागा निर्माण करणे, हॉटेल चालक व व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांसमोरील वाहन पार्किंगचे योग्य नियोजन करणे तसेच वाहतूक नियंत्रणासाठी नगरपरिषदेमार्फत ट्रॅफिक बॉयची नियुक्ती करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात आला.या सर्व उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास मुरुड शहरातील वाहतूक कोंडी आणि पार्किंगची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

वैशाली डोईफोडे यांचा सन्मान

खोपोली : खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या जनता विद्यालय, खोपोली येथे सहशिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती वैशाली अर्जुन डोईफोडे यांना पंढरपूर येथे महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने सन २०२६ चा राज्यस्तरीय ममहात्मा ज्योतिराव फुले शिक्षक पुरस्कारफ प्रदान करून गौरविण्यात आल्याने वैशाली डोईफोडे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे. के.एस.सी. महाविद्यालयात तब्बल बारा वर्षे विनाअनुदानित विभागात लिपिक म्हणून काम करत त्यांनी बी.ए., एम.ए. आणि बी.एड. शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर अनुकंपा तत्त्वावर त्यांची जनता विद्यालय, खोपोली येथे सहशिक्षिका म्हणून नियुक्ती झाली. तर शिक्षिका म्हणून कार्यरत असताना त्या केवळ अध्यापनापुरत्या मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकीही जपत आहेत.

आयबीव्हीएलतर्फे मेगा भरती

रायगड : इम्पेरेटिव्ह बिझनेस व्हेंचर्स लिमिटेड या महिलांनी स्थापन केलेल्या तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन सेवा क्षेत्रातील कंपनीने ठाणे आणि पुणे येथे २,००० हून अधिक पदांसाठी मेगा भरती मोहीम जाहीर केली आहे. या भरतीअंतर्गत बीएफएसआय, आरोग्यसेवा, ई-कॉमर्स आणि कृषी क्षेत्रांमध्ये ग्राहक सेवा, व्हॉइस, नॉन-व्हॉइस, ई-मेल, चॅट आणि बॅक ऑफिस ऑपरेशन्ससाठी संधी उपलब्ध आहेत. बारावी उत्तीर्ण, पदवीपूर्व आणि पदवीधर उमेदवारांसह फ्रेशर्स व अनुभवी उमेदवारांना अर्ज करता येणार असून एक्झिक्युटिव्ह, टीम लीडर आणि व्यवस्थापकीय पदांसाठी पूर्णवेळ तसेच अर्धवेळ नोकऱ्यांची संधी आहे. कंपनीच्या संस्थापक आणि अध्यक्षा मंजुषा पैठणकर यांनी या भरती मोहिमेद्वारे तरुण प्रतिभेला प्रोत्साहन देणे, आर्थिक स्वावलंबनाला चालना देणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. सह-संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सचिन पैठणकर यांनी स्थानिक प्रतिभेला रोजगाराच्या संधी देण्यासह संरचित प्रशिक्षण आणि व्यावसायिक विकासावर कंपनीचा भर असल्याचे नमूद केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२
- अलिबाग बिगस्प्लॅश हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट, वेटर, कॅप्टन, हाउसकीपिंग या पदांसाठी उमेदवार पाहिजेत संपर्क : 8483999229

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

कळंब केंद्रातील मोफत रक्त तपासणी बंद

। नेरळ । प्रतिनिधी ।

कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात काही वर्षांपासून रुग्णांना मोफत रक्ततपासणीची सुविधा उपलब्ध करून दिली जात होती. मात्र, मागील आठवड्यापासून ही सेवा अचानक बंद झाल्याने परिसरातील गरीब, आदिवासी तसेच सर्वसामान्य रुग्णांची मोठी गैरसोय होत आहे.

कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध असलेली मोफत रक्ततपासणी सेवा ही गरीब रुग्णांसाठी मोठा आधार होती. मात्र, ही सेवा बंद झाल्याने रुग्णांना तपासण्यांसाठी बाहेर जावे लागत असून त्यांचा आर्थिक खर्च आणि वेळ दोन्ही वाढत आहेत. विशेषतः गर्भवती महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, तापाचे रुग्ण तसेच दीर्घकालीन आजार असलेल्या रुग्णांना याचा फटका



बसण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत मोफत प्रयोगशाळा तपासणी सेवा सार्वजनिक-खासगी भागीदारी पद्धतीनेही राबवली जाते. या व्यवस्थेत खासगी सेवा पुरवठादारामार्फत प्रयोगशाळा सेवा उपलब्ध करून दिली जाते. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर रक्तनमुने संकलित करण्यासाठी आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे.

कळंब सारख्या आदिवासीबहुल भागात मोफत रक्ततपासणी सेवा बंद होणे ही गंभीर बाब आहे. शासन एका बाजूला ग्रामीण आणि आदिवासी

> **कळंब प्राथमिक आरोग्य केंद्र केंद्रातील आरोग्य अधिकारी रजेवर असल्याने माझी या प्राथमिक आरोग्य केंद्रात आठ दिवसांपूर्वीच तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती झाली आहे. त्यामुळे मोफत रक्ततपासणी सेवा बंद होण्यामागील कारणांबाबत मला सध्या माहिती नाही.**
> **- डॉ. स्वप्नील श्याम रोकडे, प्रभारी आरोग्य अधिकारी,**

भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याचे धोरण राबवत असताना दुसऱ्या बाजूला उपलब्ध असलेली सेवा बंद पडत असेल, तर त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बुवाबाजीविरोधी महिला परिषदेचे आयोजन

। रायगड । प्रतिनिधी ।

बुवाबाजी, अंधश्रद्धा आणि त्यातून महिलांचे होणारे शोषण याविरोधात जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.२४) मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे सकाळी १० वाजता राज्यस्तरीय बुवाबाजीविरोधी महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेचे उद्घाटन खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते होणार असून, सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि म हाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष संजय बनसोडे उद्घाटन सत्राचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ डॉ. अनिल डोंगरे यांचे बुवाबाजी : बळी स्त्रियांचा, एक मानसशास्त्रीय विश्लेषण या विषयावर व्याख्यान होणार आहे. बुवाबाजीच्या मानसिकतेचा आणि त्यामध्ये महिलांना लक्ष्य केले जाण्याच्या कारणांचा वेध या व्याख्यानातून घेतला जाणार आहे.

तिसऱ्या सत्रात नव्या पिढीचा दृष्टिकोन जाणून घेण्यासाठी जेन-झी टॉक ऑन बुवाबाजी या विषयावर विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये प्रियांका खेडेकर, हरी आवळे, शितल वसावे आणि गौरी जाधव हे तरुण कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

आरोग्य शिबिराला प्रतिसाद



। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील गौरकामथ येथे जिजाऊ संस्थेच्या वतीने नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला स्थानिकांनी मोठा प्रतिसाद दिल्याने तब्बल २४५ रुग्ण यांची यशस्वी तपासणी यावेळी तज्ञ डॉक्टर यांच्या माध्यमातून झाली.

जिजाऊ संस्थेचे वतीने गौरकामत गावामध्ये आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन उपसरपंच प्रतिभा देशमुख यांचे हस्ते जिजाऊ संस्थेने आयोजित केलेल्या आरोग्य शिबिराचे उद्घाटन झाले. तर शाहीर गणेश ताम्हाणे आणि ॲड. योगेश काशिनाथ देशमुख यांच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

मुरूड शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवा

- पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाची मागणी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरूड शहरातील स्वच्छता राखण्यासह नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने मुरूड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे हे निवेदन कर निर्धारण अधिकारी अनिकेत जगदाळे यांनी स्वीकारले आहे.

मुरूड नगरपरिषदेकडून शहराच्या स्वच्छतेसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असतानाही शहरातील अनेक महत्त्वाच्या ठिकाणी अस्वच्छतेचे चित्र दिसून येत आहे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी एकदरा ब्रिज ते नवाबकालीन



राजवाड्यापर्यंतच्या संपूर्ण समुद्रकिनारी तसेच शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आवश्यक असल्याचे मंडळाने निवेदनात म्हटले आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांची ओळख पटवून संबंधितांवर नियमानुसार कायदेशीर कारवाई करता येईल. त्यामुळे शहरातील स्वच्छता राखण्यास मदत होईल, असा विश्वास अरविंद गायकर यांनी व्यक्त केला आहे.

मुरूड हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्याने येथे देश-विदेशातून मोठ्या संख्येने पर्यटक येत असतात. अशा परिस्थितीत चोरी, दरोडे, घातपात, विनयभंग यांसारख्या अनुचित घटना घडल्यास सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना तपासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते. तसेच नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही सीसीटीव्ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

त्यामुळे केवळ समुद्रकिनारीच नव्हे, तर संपूर्ण मुरूड शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, मच्छीमार्केट, भाजी मंडई, सार्वजनिक ठिकाणे आणि संवेदनशील परिसरात आधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाने मुरूड नगरपरिषदेकडे केली आहे.

भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेचा वर्धापन साजरा

। नेरळ । प्रतिनिधी ।

भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेचा सातवा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.भिवपुरी रेल्वे स्थानकातील स्थानक प्रबंधक कार्यालयात केक कापून साजरा केला आनंद साजरा केला. तसेच स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशी वर्गाला पेढे वाटण्यात आले.

भिवपुरी रोड रेल्वे प्रवाशांच्या विविध समस्या मूलभूत सुविधा आणि प्रवाशांच्या हक्कांसाठी ही संघटना सातत्याने प्रयत्नशील



आहे. रेल्वे प्रवाशांना भेडसावणाऱ्या विविध अडचणी व प्रश्न रेल्वे प्रशासनापर्यंत पोहोचवून ते सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने यशस्वी पाठपुरावा केला जात आहे. प्रवाशांच्या हितासाठी आणि त्यांच्या हक्कासाठी यापुढेही संघटना अधिक जोमाने व हिरिरीने कार्यरत राहील, असा ठाम निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास स्टेशन प्रबंधक तुषार गायकवाड, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष किशोर गायकवाड, विनोद बार्णेकर, सूर्याजी बोराडे, अशोक गायकवाड, पॉईंट्समन राजेश कुमार, भूषण खैरनार, जीआरपीचे मीसाळ, होमगार्ड एच. डी. भासे, अजय यादव, तसेच पत्रकार महेश भगत आणि रामदास माळी आदी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

शिळफाटा बस अपघातातील वरदची मृत्यूशी झुंज अपयशी

। खोपोली । प्रतिनिधी ।

मुंबई-पुणे महामार्गावरील खोपोली शिळफाटा येथे १२ नोव्हेंबर रोजी झालेल्या भीषण बस अपघातातील गंभीर जखमी तेरा वर्षीय वरद देशमुख याची मृत्यूशी सुरू असलेली पाच दिवसांची झुंज अखेर अपयशी ठरली. सोमवारी उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली.

गेल्या पाच दिवसांपासून वरदची मृत्यूशी झुंज सुरू होती. त्याच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी, यासाठी कुटुंबीयांसह नातेवाईक आणि परिचित प्रार्थना करीत होते. सोमवारी सह्याद्री इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका आणि शिक्षकांनी रुग्णालयात जाऊन वरदची विचारपूस केली. मात्र, त्यानंतर काही वेळातच त्याच्या निधनाची बातमी समोर आली. हसत्या-खेळत्या वरदच्या अकाली जाण्याने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

- मंत्री आदिती तटकरे यांनी सादर केले निवेदन
- पाणी उकळून पिण्याचे ग्रामस्थांना आवाहन

'काळ' प्रदूषणाबाबत पर्यावरणमंत्र्यांचे वेधले लक्ष

। माणगाव । प्रतिनिधी ।

काळ नदीच्या वाढत्या प्रदूषणाबाबत राज्याच्या पर्यावरणीय व वातावरणीय बदल, पशु संवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी लेखी निवेदन देऊन मंत्री पंकजा मुंडे यांचे लक्ष वेधले आहे.

काळ नदीवर तालुक्यातील अनेक गावांतील नळपाणी पुरवठा योजना अवलंबून आहेत. त्यातच या भागातील गरीब शेतकरी राजा उन्हाळ्यात कलिंगड,भाजीपाला यांसारखी विविध उत्पादने घेत असतात.



यावर्षी राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. त्यातच कोकणात यावर्षी पुरेसा पाऊस न झाल्यामुळे पाणी टंचाई अनेक ठिकाणी निर्माण झाली आहे. माणगावच्या काळनदीचे पात्र दिवसेंदिवस कमी होत चालल्याने अनेकठिकाणी गावागावांतून बंधारे टाकण्याचे काम सुरु आहे. त्यातच माणगावच्या काळनदीचे पात्र आटल्याने शहरातील व आसपासच्या गावांतील नागरिकांमध्ये पिण्याच्या पाण्याच्याबाबतीत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच काळनदीचे पात्र आटल्याने या नदीच्या पाण्यावर पिवळसर, हिरवा, नारंगी तवंग भरपूर प्रमाणात जमा झाल्याने आज घडीला हि नदी प्रदूषित झाली आहे. माणगाव नगरपंचायतीतर्फे नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे यांनी माणगावकर नागरिकांना पाणी गाळून व उकळून पिण्याचे आवाहन केले आहे.

नदीच्या वाढत्या प्रदूषणाबाबत मंत्री आदिती तटकरे यांनी राज्याच्या पर्यावरणीय व वातावरणीय बदल,पशु संवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन देऊन लक्ष वेधले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, काळ नदीचे पाणी सध्या मोठ्या प्रमाणात प्रदूषित होत असल्याचे निदर्शनास आले आहे. नदीच्या पाण्यावर माणगाव शहरासह परिसरातील अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अवलंबून आहे. नदीच्या पृष्ठभागावर हिरवट, पिवळसर व लालसर तवंग दिसून येत असून, यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने चिंता निर्माण झाली आहे. नदीमध्ये मिसळणारे सांडपाणी, बांधकामांमधील सिमेंटमिश्रित पाणी, रासायनिक घटक, प्लास्टिक व इतर कचरा यामुळे प्रदूषण वाढत असल्याची शक्यता आहे. या गंभीर समस्येची दखल घेऊन नदीच्या पाण्याची तातडीने वैज्ञानिक तपासणी करणे, प्रदूषणाचे स्रोत निश्चित करून ते बंद करणे, सांडपाण्यावर प्रक्रिया करणे तसेच संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी केली आहे.

संस्कार प्रतिष्ठानतर्फे बालदिन उत्साहात

पनवेल : संस्कार प्रतिष्ठानच्या वतीने बालदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला विशेष कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात प्रतिष्ठानमध्ये सुरू असलेल्या गायन, तबला, हार्मोनियम, नृत्य, अबॅकस, जिम्नॅस्टिक्स आणि तायक्वांदो या विविध प्रशिक्षण वर्गांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. बालदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी गाव नमुना नं. ७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्रीमती वैशाली अजय ठाणेकर यांच्या मालकीचे अविभाजीत क्षेत्र त्यांचेकडून कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड

गट/हिस्सा नं.	भुधारणा पद्धती	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार रु.पै.
४१/२/ब/४	१	एकूण क्षेत्र २-३५-००	२-१७

सदरहू शेतजमीन वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वी सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन, पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंडन्स नोटिस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचे कडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजारहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलाचे लाभातील प्रस्तावित खरेदीखतास कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी

दिनांक : १८/११/२०२६

कार्यालयीन पत्ता

११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक,

द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७ खारघर - ४१०२१०

ॲड. सिद्धाराम ल. शिवशरण

एल.एल.बी.

ॲडव्होकेट हायकोर्ट

मोबाईल नंबर : ८१०८८७१८७६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी गाव नमुना नं. ७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्रीमती वैशाली अजय ठाणेकर यांच्या मालकीचे अविभाजीत क्षेत्र त्यांचेकडून कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड

गट/हिस्सा नं.	भुधारणा पद्धती	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार रु.पै.
७३/१/ब	१	२-३९-०० पोट खराबा ०-१४-०० एकूण क्षेत्र २-५३-०० पैकी खरेदी देणार यांचे अविभाजीत हिस्स्याचे क्षेत्र २-३३-००	२-७० २-६३

सदरहू शेतजमीन वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारेचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वी सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन, पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंडन्स नोटिस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचे कडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजारहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलाचे लाभातील प्रस्तावित खरेदीखतास कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी

दिनांक : १८/११/२०२६

कार्यालयीन पत्ता

११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक,

द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७ खारघर - ४१०२१०

ॲड. सिद्धाराम ल. शिवशरण

एल.एल.बी.

ॲडव्होकेट हायकोर्ट

मोबाईल नंबर : ८१०८८७१८७६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी गाव नमुना नं. ७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्रीमती वैशाली अजय ठाणेकर यांच्या मालकीचे अविभाजीत क्षेत्र त्यांचेकडून कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड

गट/हिस्सा नं.	भुधारणा पद्धती	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार रु.पै.
४०/१/ब/४	१	एकूण क्षेत्र १-८९-००	१-४१

सदरहू शेतजमीन वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वी सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन, पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंडन्स नोटिस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचे कडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजारहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलाचे लाभातील प्रस्तावित खरेदीखतास कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी

दिनांक : १८/११/२०२६

कार्यालयीन पत्ता

११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक,

द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७ खारघर - ४१०२१०

ॲड. सिद्धाराम ल. शिवशरण

एल.एल.बी.

ॲडव्होकेट हायकोर्ट

मोबाईल नंबर : ८१०८८७१८७६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी गाव नमुना नं. ७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्रीमती वैशाली अजय ठाणेकर यांच्या मालकीचे अविभाजीत क्षेत्र त्यांचेकडून कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड

गट/हिस्सा नं.	भुधारणा पद्धती	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार रु.पै.
४०/१/क/२/अ	१	एकूण क्षेत्र १-८९-००	१-४१

सदरहू शेतजमीन वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वी सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन, पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंडन्स नोटिस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचे कडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजारहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलाचे लाभातील प्रस्तावित खरेदीखतास कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी

दिनांक : १८/११/२०२६

कार्यालयीन पत्ता

११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक,

द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७ खारघर - ४१०२१०

ॲड. सिद्धाराम ल. शिवशरण

एल.एल.बी.

ॲडव्होकेट हायकोर्ट

मोबाईल नंबर : ८१०८८७१८७६

शुद्धीपत्रक

दि. ०८/११/२०२६ रोजी पान क्र. ६ वर ॲड. भुपेश पेमारे यांची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली असून त्यामध्ये प्लॉट नं. ३६९ असून नजरचुकीने प्लॉट नं. ३५९ छापण्यात आले आहे. तरी ते प्लॉट नं. ३६९ असे वाचण्यात यावे.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड येथील खाली सविस्तर वर्णन केलेली शेतजमीन आमचे अशिलांनी गाव नमुना नं. ७/१२ चे उताऱ्यावरील भोगवटादार श्रीमती वैशाली अजय ठाणेकर यांच्या मालकीचे अविभाजीत क्षेत्र त्यांचेकडून कायम खरेदीखतांन्वये खरेदी करण्याचे ठरविले आहे.

शेतजमिनीचे वर्णन

मौजे-आंभेरपाडा ता. कर्जत जि. रायगड

गट/हिस्सा नं.	भुधारणा पद्धती	क्षेत्रफळ (हे.आर.)	आकार रु.पै.
४०/१/क/२/अ	१	एकूण क्षेत्र १-८९-००	१-४१

सदरहू शेतजमीन वर नमूद भोगवटादारांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध, कुळवहिवाट, ताबेकब्जा, बोजा, सामंजस्य करार, साठेकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, खरेदीखत, विकसन करार, विकसनापूर्वी सामंजस्य करार, विकसनाचे कुलमुखत्यारपत्र, मृत्युपत्र, गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन, पोटगी हक्क, कुळ हक्क, रस्त्याची वहिवाट, दिवाणी दावा, अपील अथवा तत्सम प्रकरण, लिस पेंडन्स नोटिस अथवा सदरहू मिळकतीत अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांच्या लेखी हरकती ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत योग्य त्या नोटरी पब्लिक यांचे कडून प्रमाणित केलेल्या सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास, सदरहू मिळकत निर्वेध, निर्विवाद व बोजारहित आहे आणि वर नमूद भोगवटादारांचे मालकी हक्क स्वच्छ व निर्विवाद आहे व आमच्या अशिलाचे लाभातील प्रस्तावित खरेदीखतास कोणाचाही कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद भोगवटादारांबरोबर खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व त्या आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी

दिनांक : १८/११/२०२६

कार्यालयीन पत्ता

११ वा मजला, जेएम प्राईम इन्फाटेक,

द लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर ७ खारघर - ४१०२१०

ॲड. सिद्धाराम ल. शिवशरण

एल.एल.बी.

ॲडव्होकेट हायकोर्ट

मोबाईल नंबर : ८१०८८७१८७६

PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that my client has entered into negotiations with Mr. Manjit Shashikant Mohite ("Owner") who is the owner of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and is proposing to purchase/acquire all the rights, title and interest in the said Property. Therefore, on instructions, I am issuing this public notice as under:

All persons/entities, including any lender, bank or financial institution or entity having any claim and / or demand and/ or objection against or in respect of the right, title, share or interest of the Owners in/to the Property or any part thereof, in furtherance to or under any sale, transfer, assignment, gift, exchange, lease, leave and license, tenancy, possession, use, occupation, trust, maintenance, easement, acquisition, requisition, power of attomey, lis pendens, mortgage, lien, charge, hypothecation (including by way of receivables), pledge, guarantee, loans, debts, advances, inheritance, devise, bequest, partition, settlement or under any attachment, injunction, decree, order, judgment, or award by any court of law, tribunal, revenue or statutory authority or arbitration or under any agreement, memorandum of understanding, term sheet and/or any other deed or document (either agitated in any litigation or otherwise) or any claim or demand which is adverse to or inconsistent with the right, title or interest of the Owners or even otherwise any other right, title, demand, claim or interest whatsoever to or in respect of or concerning the Property or any part thereof ("Claim") are hereby required to make the same known in writing to the undersigned at the address mentioned herein within 10 (ten) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the said Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demandor objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:
(Description of the Property)

All that piece and parcel of land admeasuring 0.24.50 Akak H.R. Sq. Mtrs. from and out of land bearing Bhumapan Kramank/ Upavibhag 114/1 admeasuring in total 0.83.40 Akak H.R. Sq. Mtrs., Assessing at Rs. 3.99 Ps. along with Bungalow, Swimming Pool, etc. standing thereon, being, lying and situate at Village Dawale, Taluka Alibag, District Raigad.

Adv. S. Y. Bartake
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka, Alibag, Tal. Alibag, Dist. Raigad, 402 201.

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तळाशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री.पुरूषोत्तम बाळाराम गावंड, राहणार पेणकरपाडा, ठाणे, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील मिळकतीपैकी पश्चिमेकडील ०-२२-०० (हे.आर), ही शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरित झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. पुरूषोत्तम बाळाराम गावंड, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/ संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु. पैसे)
तळाशेत, ता.अलिबाग,	१३/ब/१	०-३६-०० ०-०९-०० पो.ख. ०-४५.०० एकूण	५-७५

सदरील मिळकतीपैकी पश्चिमेकडील ०-२२-०० (हे.आर), ही शेतजमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक १८/१२/२०२६.

सही/
(ॲड. संजय म.भगत)
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या मिळकतीचे मालक १. सौ. अश्विनी अशोक गावडे २ श्री. रविंद्र नारायण जोशी दोघे रा. बेलखार, पो. कोकबन, ता. रोहा, जि.रायगड यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली मिळकत आमचे अशिल यांना कायम विकत देण्याचे ठरविले आहे. तसा ठराव केलेला आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

मौजे.कोकबन, ता.रोहा, जि.रायगड येथील

१. गट क्रमांक व उपविभाग ३४२ क्षेत्र ०.५९.०० हे. आर आकार ०.४४ रू. पैसे
२. गट क्रमांक. व उपविभाग ३२१ क्षेत्र ०.३४.३० हे.आर आकार ०.२२ रू. पैसे

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे, असे समजून त्यासंबंधी कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाहीत असे गृहित धरून सदर व्यवहार पुर्ण केला जाईल व मुदतीतनंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही यांची नोद घ्यावी.

ता. १८/११/२०२६

ॲड. जी. के. पाटील
शिवम सोसायटी, शॉप नं.३, तळ मजला,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड

जाहीर सूचना

ज्या कोणाशी संबंधित असेल

कृपया नोंद घ्यावी की, (१ए) चंद्रभागा आत्माराम पाटील, (१बी) सुनील आत्माराम पाटील, (१सी) सविता विजय शिंगरूट, (१डी) सीमा आत्माराम पाटील, (१ई) सुरेखा महेश गावंड, (१एफ) सुषमा निलेश पाटील (अ. क्र. (१ए) ते (१एफ) हे आत्माराम महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस), (२ए) छाया अशोक पाटील, (२बी) उदय अशोक पाटील, (२सी) सानिका शैलेश घरत, (२डी) मानसी मनोज लवाटे (अ. क्र. (२ए) ते (२डी) हे दत्ताराम/दत्तात्रय महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस), (३ए) ताराबाई शांताराम पाटील, (३बी) विजय शांताराम पाटील, (३सी) संजय शांताराम पाटील, (३डी) शशिकला विनायक गावंड, (३ई) वंदना सतीश म्हात्रे (अ. क्र. (३ए) ते (३ई) हे शांताराम महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस) आणि (४ए) सुरेश शंकर पाटील, (४बी) नरेश शंकर पाटील, (४सी) संदेश शंकर पाटील, (४डी१) रेखा शिरीष पाटील, (४डी२) श्रुती शिरीष पाटील, (४डी३) प्रतीक शिरीष पाटील (अ. क्र. (४डी१) ते (४डी३) हे शिरीष शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस), (४ई) ललिता दत्तात्रय मोकल, (४एफ) वनीता गजानन म्हात्रे, (४जी) सुनीता बिपीन ठाकूर, (४एच) नीता राजेंद्र माने, (४आय) गीता शंकर मोरे (अ. क्र. (४ए) ते (४आय) हे शंकर महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस) (यापुढे एकत्रितरीत्या मालक म्हणून उल्लेखित) यांनी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जमिनीचे माझ्या अशिलांच्या नावे विक्री, हस्तांतरण व अभिहस्तांतरण करण्याचे मान्य केले आहे.

त्यामुळे, सदर अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस विक्री, अदलाबदल, गहाण, बक्षीस, विश्वस्त हक्क, वारसा, ताबा, सुखेभोगाधिकार, भाडेकरार, भाडेहक्क, बोजा, धारणाधिकार अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा, मालकी हक्क किंवा हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यासंबंधीच्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यांसह या जाहीर नोटीसच्या प्रसिध्दी दिनांकापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या कार्यालयात पत्ता: १०१, रोज रेसिडेंसी, पहिला मजला, दीक्षित रोड (विस्तार), श्रध्दानंद रोडजवळ, विले पार्ले (पूर्व), मुंबई – ४०० ०५७ येथे किंवा adv.mark.dmello@gmail.com या ई–मेल पत्त्यावर पाठवाव्यात. वरील मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही हक्क, दावा, मालकी हक्क किंवा हितसंबंध नसल्याचे गृहीत धरले जाईल. तसेच, अस्तित्वात असलेला कोणताही दावा सोडून दिलेला आहे असे मानून संबंधित व्यक्तीच्या कोणत्याही दाव्याचा विचार न करता सदर मालमत्तेची विक्री, हस्तांतरण व अभिहस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.

वरील संदर्भित अनुसूची

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग, मौजे नारंगी येथे स्थित असलेली व ग्रामपंचायत नारंगी हद्दीतील तसेच नोंदणी उपजिल्हा अलिबाग आणि नोंदणी जिल्हा रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील खालील प्रमाणे सर्व्हे/हिस्सा क्रमांक असलेली जमीनः–

सर्व्हे क्र.	हिस्सा क्र.	निर्धारण (रु. – पै.)	क्षेत्र हे.–आर.–चौ.मी.		क्षेत्र (चौ.मी.)
४९	१एफ	९-३६	पिकयोग्य क्षेत्र	०-३०-३०	३,०३०
			पोटखराबा	०-१०-३०	१,०३०
			एकूण	०-४०-६०	४,०६०

व हक्क अभिलेखानुसार अंदाजे ०.४०.६० हेक्टर–आर–चौ.मी. (म्हणजेच ४०६० चौरस मीटर) क्षेत्रफळ असलेली जमीन जिच्या चतुःसीमा खालील प्रमाणेः

उत्तरेस वा त्या दिशेस : सेलिन सिन्थिया डिसूजा यांची मालमत्ता
दक्षिणेस वा त्या दिशेस : अंतर्गत रस्ता
पूर्वेस वा त्या दिशेस : संतोष चाहू पाटील यांची मालमत्ता
पश्चिमेस वा त्या दिशेस : रामचंद्र पाटील यांची मालमत्ता

सही/–
ठिकाणः मुंबई
दिनांकः १९ नोव्हेंबर २०२६
(मार्क डीमेलो)
वकील, उच्च न्यायालय

- जाहीर नोटीस-

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येत आहे की, श्री. जितेंद्र चंद्रकांत सरतांडेल, रा. बी- ०२, डी.ए.ई. ऑफिसर फ्लॅट्स, प्लॉट नं. ३७९, १५ वा रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई ४०००५० यांच्या मालकीची व ताबेकब्जातील मौजे शिरगांव, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील परिशिष्टामधील वर्णन केलेली भातशेती जमीन मालक माझे अशिल यांनी कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	हि. नं. -	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू. पै.)
शिरगाव ता.मुरूड	१४२/१		१-८७-००	१.५२
		पो.ख	०-५४-००	
		एकूण	२-४१-००	

या मिळकतीपैकी श्री. जितेंद्र चंदकांत सरतांडेल यांच्या मालकी हक्कातील २-४१-०० हे. आर आकार रू. १.५२ पैसे या मिळकतीपैकी ०-१६-०० हे. आर. मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान जमिन मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणा व्यक्तिचा, संस्थेचा अथवा आर्थिक संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती आमचे खालील नमुद पत्यावर समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे गृहीत धरून माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १८.११.२०२६

सही/-
श्री. निरंजन मनोज कंदाडे
ए-६०४, गौतम कॉम्प्लेक्स सीएचएम, एलॉट नं. १७, १८,
सेक्टर ११ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ठाणे, महाराष्ट्र
४००६१४. मो. नं. ९९३०६०३५५४

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

१. श्री.अनंत जनार्दन वाघमारे, २.संजना संजय अंबोले, मु.मुशेत ता.अलिबाग, जि.रायगड यांचे नावे मौजे मुशेत, ता.अलिबाग, येथे मापगाव ग्रामपंचायत हद्दीमधील खालील वर्णनाची जिरायत मिळकत आहे. सदर मिळकतीत असणारा त्यांचा निम्मा हिस्सा अशिलांस विकण्याचे ठरले असून तसा करार झाला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे मुशेत, ता.अलिबाग, जि.रायगड येथील

भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.चौ.मी)	आकार (रू.पै.)
११० (पूर्वीचा सर्व्हे नं ५२/२ व ५५/४)	०-५४-१० पो.ख.०-००-५० एकूण ०-५४-६० पैकी निम्मा हिस्सा ०-२७-३०	०५.१३

सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचे मालक सांगत आहेत. तरी वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, लिज, लिएन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधीच्या लेखी हरकती असल्यास खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकतींमध्ये अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क/हितसंबंध नाहीत असे गृहित धरून आमचे अशिलांना यापुढील खरेदीव्यवहार पूर्ण करता येईल व नंतर येणाऱ्या हरकतींना आमचे अशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील हे सर्वांस जाहीर व्हावे.

अलिबाग
दिनांक : / / २०२६

सही/-
ॲड.मच्छिंद्र एस म्हात्रे
शॉप नं.२, दुय्यम निबंधक
कार्यालय अलिबागच्या समोर
अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८९००७९३०२

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान सहहिस्सेदार मालक १) शैला अविनाश पाटील, २) उर्मिला गोरखनाथ म्हात्रे, ३) मीना दत्तात्रेय नाईक, ४

निवडक

माटुंग्यात रंगणार खो-खोचा महासंग्राम!

मुंबई : मुंबई जिल्हा खो-खो अजिंक्यपद पटकावण्यासाठी पुरुष आणि महिला संघांमध्ये जोरदार चुरस रंगणार आहे. मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि प्रज्ञा वर्धिनी फाउंडेशनच्या आयोजनाखाली पुरुष-महिला मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १९ ते २२ नोव्हेंबरदरम्यान माटुंगा येथील ओम समर्थ भारत व्यायाम मंदिराच्या मैदानावर पार पडणार आहे. या स्पर्धेत मुंबईतील जवळपास २४ नामांकित संघ सहभागी होणार असून, जिल्हा विजेतेपदासह राज्य स्पर्धेसाठी मुंबईच्या संघात स्थान मिळवण्यासाठी खेळाडूंमध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. या स्पर्धेतील खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारे मुंबईचे पुरुष आणि महिला संघ निवडले जाणार आहेत. निवड झालेले संघ २८ नोव्हेंबरपासून अहिल्यानगर येथे सुरू होणाऱ्या राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत मुंबईचे प्रतिनिधित्व करतील. त्यामुळे जिल्हा अजिंक्यपदाच्या लढतींबरोबरच राज्य संघात स्थान मिळवण्यासाठीही प्रत्येक खेळाडूला आपले कौशल्य सिद्ध करावे लागणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक रोहित राऊळ यांच्या हस्ते १९ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. माटुंगा पश्चिम येथील ओम समर्थ भारत व्यायाम मंदिराच्या मैदानावर हा सोहळा पार पडेल. यावेळी व्यायाम मंदिराचे विश्वस्त उमेश नरवणे (सी.ए.), मुंबई खो-खो संघटनेचे पदाधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेच्या सुरुवातीचे सामने बाद पद्धतीने खेळवण्यात येणार आहेत. त्यानंतर अंतिम चार संघांमध्ये साखळी पद्धतीने सामने होतील.

भारत-पॅलेस्टाईन सामन्यात वंशद्वेष?

नवी दिल्ली : भारताच्या १७ वर्षांखालील पुरुष फुटबॉल संघाचा कर्णधार दलालमुओन गँगटे याच्याविरुद्ध मैदानावर कथित वर्णद्वेषी हातवारे केल्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. याबाबत ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनने आशियाई फुटबॉल महासंघांकडे अधिकृत तक्रार देखील केली आहे.काल क्वालालंपूर फुटबॉल स्टेडियमवर भारत आणि पॅलेस्टाईन फुटबॉलचा सामना खेळवला गेला. भारत आणि पॅलेस्टाईन यांच्यात एएफसी अंडर१७ आशियाई कपचा क्वालिफायर सामना खेळवण्यात आला आहे. या सामन्यादरम्यान पॅलेस्टाईनच्या एका खेळाडूने भारतीय संघाचा कर्णधार दलालमुओन गँगटे याला उद्देशून आक्षेपार्ह आणि वर्णद्वेषी हातवारे केल्याचा आरोप केला जात आहे. खेळाच्या मैदानावर असे कोणतेही कृत्य खपवून घेतले जाणार नाही असा इशारा ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनने दिला आहे. कोणत्याही प्रकारचा वर्णद्वेष सहन केला अजनर नाही अशी भूमिका घेण्यात आली आहे. भारतीय महासंघाने या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल आणि पुरावे सादर करत एएफसीकडे औपचारिक तक्रार नोंदवली आहे. संबंधित पॅलेस्टाईन खेळाडूवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भारताकडून करण्यात आली आहे.



टेनिस लीगमध्ये खेळाडूंची मांदियाळी

बंगळुरू : वर्ल्ड टेनिस लीगच्या पाचव्या पर्वासाठी टेनिस विश्वातील दिग्गज खेळाडूंची मांदियाळी सज्ज झाली आहे. माजी जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू कारोलिना प्लिश्कोव्हा, ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती बेलिंडा बेन्शिच, एलिना स्वितोलिना, निक किर्गिओस आणि विम्बल्डन दुहेरी विजेता हॅरी हेलिओव्हारा यांच्यासह एकूण १६ आंतरराष्ट्रीय आणि भारतीय टेनिसपटू स्पर्धेत सहभागी होणार आहेत.१७ ते २० डिसेंबर २०२६ या कालावधीत बंगळुरू येथील केएसएलटीएच्या एस. एम. कृष्णा टेनिस स्टेडियमवर ही स्पर्धा रंगणार आहे. प्रत्येक संघात आंतरराष्ट्रीय खेळाडूंसह भारतातील आघाडीच्या टेनिसपटूंचा समावेश असेल. महिला खेळाडूंमध्ये युक्रेनची एलिना स्वितोलिना हे प्रमुख आकर्षण असेल. तिच्या नावावर २० डब्ल्यूटीए एकेरी विजेतेपदे असून, २०१८ मध्ये तिने डब्ल्यूटीए फायनल्सचे विजेतेपद पटकावले होते. स्वित्झर्लंडची बेलिंडा बेन्शिच हिने टोकियो २०२० ऑलिम्पिकमध्ये एकेरीचे सुवर्णपदक जिंकले आहे. चेकियाची कारोलिना प्लिश्कोव्हा आणि स्पेनची पॉला बाडोसा यांचाही स्पर्धेत सहभाग असेल. पुरुषांच्या गटात ऑस्ट्रेलियाचा निक किर्गिओस आपल्या आक्रमक खेळशैलीने चाहत्यांचे मनोरंजन करण्यास सज्ज आहे. २०२२ मध्ये त्याने विम्बल्डनची अंतिम फेरी गाठली होती. कझाकस्तानचा अलेक्झांडर ब्युब्लिक, बेल्जियमचा झिझू बर्म्स आणि फिनलंडचा हॅरी हेलिओव्हारा हे अन्य आंतरराष्ट्रीय खेळाडू असतील. हेलिओव्हारा याने २०२४ आणि २०२६ मध्ये विम्बल्डन पुरुष दुहेरीचे विजेतेपद पटकावले आहे.



साउथ एशियन फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा

भारताचा दस का दम

| ढाका | वृत्तसंस्था |

भारताने पाकिस्तानचा २-१ असा पराभव करून १०व्यांदा साउथ एशियन फुटबॉल चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. ढाक्याच्या नॅशनल स्टेडियममध्ये मंगळवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारतीय संघ मध्यंतरापर्यंत १-० ने पिछाडीवर होता. दुसऱ्या हाफमध्ये पाकिस्तानच्या एका खेळाडूला रेड कार्ड मिळाले. याचा फायदा घेत सुहैल अहमद भटने ६०व्या मिनिटाला गोल करून भारताला बरोबरी साधून दिली.त्यानंतर सामना संपण्यास दोन मिनिटे बाकी असताना, म्हणजेच ८८व्या मिनिटाला, संदीप मांडीने हेडरद्वारे गोल केला आणि भारताला २-१ असा विजय मिळवून दिला.

या विजयासह भारताने सलग तिसऱ्यांदा चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. संघ २०२१ आणि २०२३ मध्येही चॅम्पियन ठरला होता.भारत या स्पर्धेच्या इतिहासात सलग तीन वेळा विजेतेपद पटकावणारा पहिला संघ ठरला आहे. तर, पाकिस्तान प्रथमच अंतिम फेरीत पोहोचला होता.

पहिल्या हाफमध्ये पाकिस्तानने दोन्ही विंगवरून हल्ले करत भारतावर दबाव निर्माण केला. १८व्या मिनिटाला मॅकेल अब्दुल्लाच्या शॉटला गोलरक्षक अर्श शेखने अडवले. पाकिस्तानला सलग हल्ल्यांचा फायदा पहिल्या हाफच्या इंज्युरी टाइममध्ये मिळाला. जुनैद शाहने लो क्रॉस दिला, जो भारतीय बचावफळीला योग्यरीत्या क्लिअर करता आला नाही. चेंडू अलमगीर अली खान गाझीकडे पोहोचला आणि त्याने बॉक्सच्या आतून शानदार कर्लिंग शॉट मारत गोल केला.दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला भारताने मॅकार्टन निक्सनला मैदानात उतरवले. तो मँगलेंथांग किपगेनच्या जागी आला. या बदलानंतर भारतीय संघाच्या आक्रमणांना वेग आला.

५९व्या मिनिटाला सामन्यात मोठा टर्निंग पॉइंट आला. पाकिस्तानच्या जुनैद शाहने ब्रिसन फर्नांडिसच्या गुडघ्याजवळ स्टड्ससह धोकादायक टॅकल केला. रेफरीने वर घटना पाहिल्यानंतर त्याला थेट रेड कार्ड दाखवले. पाकिस्तानला उर्वरित सामना १० खेळाडूंसह खेळावा लागला.भारताने या संधीचा त्वरित फायदा घेतला. ६०व्या मिनिटाला लुंगडिमने उजव्या बाजूने क्रॉस दिला. चेंडू मॅकार्टन निक्सनला किंचित लागून सुहैल भटकडे पोहोचला. त्याने संधी न गमावता चेंडू गोलमध्ये पाठवला. स्कोअर १-१ असा बरोबरीत झाला.

बरोबरीनंतर भारताने सातत्याने आक्रमणे केली. ६७व्या मिनिटाला निखिल प्रभूच्या पासवर विष्णूकडे गोल करण्याची संधी होती, मात्र तो घसरला आणि त्याचा शॉट थेट गोलरक्षकाकडे गेला.८८व्या मिनिटाला भारताला निर्णायक गोल मिळाला. अब्दुल रबीहने कॉर्नर घेतला. चेंडू पेनल्टी एरियात पोहोचला, जिथे संदीप मांडीने उंच उडी मारून हेडर केला. चेंडू जमिनीवर आदळून गोलमध्ये गेला. भारत २-१ ने आघाडीवर गेला.या स्पर्धेत भारताचा वरिष्ठ राष्ट्रीय संघ सहभागी झाला नव्हता. मुख्य प्रशिक्षक खालिद जमील यांच्या नेतृत्वाखालील वरिष्ठ संघ न्यूझीलंडमध्ये दोन आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामने खेळण्यासाठी गेला होता. चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या डेव्हलपमेंटल संघाला नौशाद मूसा यांनी प्रशिक्षण दिले. या संघाने स्पर्धेतील आपले तिन्ही सामने जिंकत अंतिम फेरी गाठली. भारताने गट टप्प्यात पाकिस्तानचा आणि मालदीवचा असा पराभव केला होता.

प्रियांशी पाटीलचा शुक्रवारी जाहीर सत्कार



| चिरनेर | प्रतिनिधी |

उरणची लेक प्रियांशी मयूर पाटील हिने अवघ्या १४ व्या वर्षी नुकत्याच झालेल्या युवा ऑलिंपिकमध्ये विंडसर्फिंगमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. युवा ऑलिंपिकमध्ये २३ देशांचे खेळाडू सहभागी झाले होते. त्या सर्वांना त्या त्या देशाने कोच उपलब्ध करून दिला होता. मात्र प्रियांशीला कोच नव्हता.

तरीही युवा आलिंपिकमध्ये ती सहावी (टॉप- १०) आली. अतिशय कमी वयात तिने केलेली कामगिरी उल्लेखनीय असल्याने आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांना तिचा सार्थ अभिमान आहे. ती उरणची लेक आहे. रायगड कन्या आहे. प्रियांशी ही २०२५ आणि २०२६ मधील डबल एशियन मेडलिस्ट आहे. तिने गेल्या वर्षभरात १५ नॅशनल आणि ३ इंटरनॅशनल पदके पटकावली आहेत. ती एक उत्तम जलतरणपटूही आहे. त्यामुळे सध्या तिचे नाव जगभर चर्चिले जात आहे.

कुठल्याही प्रशिक्षकाशिवाय तिने आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यामुळे तिची जगभरातील मीडियाने दखल घेतली.

तिच्या घरची परिस्थिती नाजूक असल्याने आई-वडिलांना तिचा विविध स्पर्धांना जाण्याचा आणि प्रशिक्षणाचा खर्च पेलवत नाही. मात्र आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत हे आजपर्यंत तिच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले आहेत. ज्या ज्या वेळी तिला गरज होती त्या त्या वेळी महेंद्र घरत यांनी तिला आर्थिक सहकार्य केले आहे.

आई (रुचिका), वडील (मयूर पाटील) यांची कठोर मेहनत आणि महेंद्र घरत यांची सहकार्याची भूमिका युवा ऑलिंपिकमध्ये चमकदार कामगिरी केलेल्या प्रियांशीसाठी अतिशय महत्त्वपूर्ण ठरली आहे. त्यामुळेच प्रियांशी आणि तिच्या आई-वडिलांचा जाहीर सत्कार व्हावा, असे महेंद्र घरत यांना वाटत असल्याने यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे शुक्रवारी (दि.२०) सायंकाळी शेलघर येथील समाज मंदिरात तिचा आई-वडिलांसह यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.

१६ डिसेंबरला गोव्यात मिनी ऑक्शन

| मुंबई | प्रतिनिधी |

मंगळवारी एकूण १० संघांनी रिटेन्शन लिस्ट जाहीर केली. त्यानंतर आता काही तासांनी आयपीएल गव्हर्निंग काउन्सिलकडून २० व्या हंगामासाठीच्या मिनी ऑक्शनची तारीख जाहीर करण्यात आली आहे.सोशल मीडिया पोस्टमध्ये देण्यात आलेल्या माहितीनुसार, १६ डिसेंबरला गोव्यात मिनी ऑक्शन होणार आहे. या मिनी ऑक्शनला सकाळी ११ वाजता सुरुवात होणार आहे.

आगामी लिलावासाठी सर्व १० आयपीएल संघांकडे शिल्लक असलेल्या रकमेचा (पर्स) तपशील समोर आला आहे. यामध्ये लखनौ सुपर जायंट्सकडे सर्वाधिक ४७.४५ कोटी रुपये, तर गुजरात टायटन्सकडे सर्वात कमी ८.७५ कोटी रुपये शिल्लक आहेत.

इतर संघांमध्ये कोलकाता नाइट रायडर्सकडे ४१.६५ कोटी, सनरायझर्स हैदराबादकडे ४०.१५ कोटी आणि दिल्ली कॅपिटल्सकडे ३९.५० कोटी रुपये आहेत. तसेच मुंबई इंडियन्सच्या खात्यात ३२.६० कोटी, चेन्नई सुपर किंग्सकडे २८.०५ कोटी आणि राजस्थान रॉयल्सकडे २७.०५ कोटी रुपये शिल्लक आहेत. याशिवाय पंजाब किंग्सकडे १८.६० कोटी आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडे १४.१५ कोटी रुपयांचा निधी शिल्लक राहिला आहे.

फुटबॉलपटू रोनाल्डिन्होचे पुनरागमन

| रेव्हेन्ना | वृत्तसंस्था |

ब्राझीलचा महान फुटबॉलपटू रोनाल्डिन्हो याने निवृत्तीनंतर दशकाहून अधिक काळाने पुन्हा एकदा क्लब फुटबॉलमध्ये पुनरागमन केले आहे. वयाच्या ४६ व्या वर्षी त्याने रविवारी इटलीतील तिसऱ्या श्रेणीच्या रेव्हेन्ना क्लबकडून सामना खेळला. या स्थानिक प्रतिस्पर्धी फोर्लीविरुद्धच्या सामन्यात रेव्हेन्नाने २-० असा विजय मिळवला.

रेव्हेन्नाच्या स्टेडिओ ब्रुनो बेनेली मैदानावर रोनाल्डिन्होचे चाहत्यांनी जल्लोषात स्वागत केले. सामन्यात त्याने उजव्या बाजूचा बचावपटू ज्युलिओ दोनाती याच्या पहिल्या गोलच्या चालीत महत्त्वाची भूमिका बजावली. गोल झाल्यानंतर त्याने सहकारी खेळाडूंसोबत आनंदोत्सव साजरा केला.

रेव्हेन्नाकडून खेळताना रोनाल्डिन्होने नेहमीचा १० क्रमांकाचा जर्सी परिधान केला होता. वयामुळे त्याचा पूर्वीचा वेग आणि चपळता काहीशी कमी झाली असली, तरी चेंडूवरील त्याचे नियंत्रण, अचूक पास आणि क्रॉस मारण्याची शैली प्रभावी होती. त्याच्या चेहऱ्यावरील नेहमीचे हास्यही चाहत्यांना पाहायला मिळाले. जूनमध्ये रोनाल्डिन्होने इटलीतील सेरी सी स्पर्धेत खेळणाऱ्या रेव्हेन्ना क्लबशी अनपेक्षितपणे करार केला होता. २०१५ मध्ये ब्राझीलमधील रिओस्थित फ्लुमिनेन्स क्लबकडून खेळल्यानंतर क्लब फुटबॉलमधील हा त्याचा पहिलाच सामना होता. रविवारी झालेल्या सामन्यात पहिल्या सत्रात रेव्हेन्नाने १-० अशी आघाडी घेतल्यानंतर मध्यंतराला रोनाल्डिन्होला विश्रांती देण्यात आली. रेव्हेन्ना क्लब सध्या सेरी सी स्पर्धेतील आपल्या गटातून पदोन्नती मिळवण्यासाठी प्रयत्नशील आहे. या स्पर्धेचे भौगोलिक आधारावर तीन गट करण्यात आले आहेत. रेव्हेन्ना क्लबचे व्यवस्थापन सिप्रियानी रेस्टॉरंट ब्रँडशी संबंधित इग्राझिओ सिप्रियानी यांच्याकडे आहे. अप्रतिम तांत्रिक कौशल्य, चेंडूवरचे विलक्षण नियंत्रण, कल्पक ड्रिब्लिंग, ताकद आणि गोल करण्याची अफलातून क्षमता यामुळे रोनाल्डिन्होने फुटबॉलविश्वात वेगळी ओळख निर्माण केली.



नागपुरात रंगणार केसरीचा महासंग्राम

| नागपूर | प्रतिनिधी |

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा तब्बल १३ वर्षांनंतर पुन्हा एकदा नागपुरात रंगणार आहे. त्यामुळे विदर्भातील कुस्तीप्रेमींना राज्यातील नामांकित मल्लांचा कुस्तीचा थरार प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे. नागपूर महानगरपालिका आणि नागपूर कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. २० ते २४ जानेवारी या कालावधीत ही स्पर्धा पार पडेल. लकडगंज परिसरातील सरदार पटेल मैदानावर कुस्तीचा हा महासंग्राम रंगणार आहे.

श्रीलंकेचे पाकिस्तानसमोर लोटांगण

| रावळपिंडी | वृत्तसंस्था |

पाकिस्तानी गोलंदाजांनी दुसऱ्या कसोटीत अक्षरशः धुमाकूळ घातला.मोहम्मद अब्बास, रझ उल्लाह आणि आमेर जमाल यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेताना श्रीलंकेचा पहिला डाव ९८ धावांवर गुंडाळला.

रावळपिंडी येथे सुरू असलेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्याचा हा निर्णय गोलंदाजांनी अगदी योग्य ठरवला. श्रीलंकेच्या फलंदाजांना पाकिस्तानी गोलंदाजांच्या वेगवान माऱ्याचा सामना करता आला नाही. तब्बल आठ फलंदाजांना दुहेरी धावसंख्याही गाठता आली नाही.



पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच वर्चस्व गाजवताना श्रीलंकेचा निम्मा संघ ३६ धावांत माघारी पाठवला. १७.१ षटकांत आघाडीचे पाच फलंदाज तंबूत गेल्यानंतर कर्णधार कुसल मेंडीस व सोनल दिनुशा यांच्या खांद्यावर मोठी जबाबदारी होती. या दोघांनी काहीकाळ खिंड लढवलीही, परंतु आमेरने या जोघांनाही माघारी पाठवले. कुसल ३२ ,तर सोनल २१ धावांवर बाद झाला. यानंतर श्रीलंकेला जेमतेम १३ धावा जोडता आल्या.

८५ धावांवर सहावी विकेट गमावल्यानंतर पुढील १३ धावांत श्रीलंकेचे उर्वरित चार फलंदाज बाद झाले. मोहम्मदने १४-६-१४-३ अशी स्पेल टाकली, तर रझ उल्लाहने २१ धावांत ३, तर आमेरने २४ धावांत ३ विकेट्स घेतल्या. साकिब खानने एक बळी टिपला. रावळपिंडीच्या मैदानावरील ही सर्वात निचांक धावसंख्या ठरली. यापूर्वी २०२४ मध्ये पाकिस्तानने इंग्लंडचा डाव ११२ धावांवर गुंडाळला होता.

अमृता अन् नेहाची कुस्ती संघात निवड

| मुरगूड | वृत्तसंस्था |

अमृता पुजारी आणि नेहा चौगुले या दोन कुस्तीपटूंची दक्षिण आफ्रिका येथे होणाऱ्या कॉमनवेल्थ अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली. अमृता पुजारी हिची ७२ किलो वजन गटात, तर नेहा चौगुले हिची ५० किलो वजन गटात निवड झाली. या दुहेरी निवडीमुळे मुरगूडच्या कुस्ती संकुलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.अमृताने यापूर्वी आशियाई आणि जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.

विलिंग्डन जिमखाना स्पर्धेत पटकावले विजेतेपद | ४० वर्षांनंतर जिमखान्यात स्पर्धेचे आयोजन

कॅरमच्या पटावर सागर अन् सोनालीचा दबदबा!

| मुंबई | प्रतिनिधी |

विलिंग्डन कॅथलिक जिमखाना, सांताक्रूझ येथे आयोजित पहिल्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत पुण्याच्या सागर वाघमारे आणि मुंबईच्या सोनाली कुमारी यांनी विजेतेपद पटकावले. पुरुष आणि महिला एकेरी गटातील अंतिम सामने चुरशीचे झाले. महाराष्ट्र कॅरम असोसिएशन आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेच्या मान्यतेने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



पुरुष एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात पुण्याच्या सागर वाघमारेने ठाण्याच्या संदीप दिवे याच्यावर सरळ दोन सेटमध्ये मात केली. सागरने २३-१६ आणि १६-१२ अशा फरकाने विजय मिळवत स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावावर केले.तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात मुंबईच्या निलांश चिपळूणकरने बाजी मारली. त्याने मुंबईच्याच सिद्धांत वाडवलकरविरुद्ध पहिला सेट गमावला. मात्र, त्यानंतर जोरदार पुनरागमन करत पुढील दोन सेट जिंकले.

महिला एकेरी गटाच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या सोनाली कुमारीने विजेतेपदावर नाव कोरले. मुंबईच्याच मिताली पाठकविरुद्ध झालेल्या तीन सेटच्या लढतीत सोनालीला सुरुवातीला पराभवाचा सामना करावा लागला. मितालीने पहिला सेट जिंकला. मात्र, सोनालीने दुसऱ्या सेट आणि तिसऱ्या सेटमध्ये बाजी मारत विजेतेपद पटकावले.या गटातील तिसऱ्या क्रमांकाच्या सामन्यात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने रत्नागिरीच्या आकांक्षा कदमचा पराभव केला.

विजेत्या खेळाडूंना विलिंग्डन कॅथलिक जिमखान्याचे अध्यक्ष दीपक नेटो, सचिव रोहिन ग्रेसियस, क्रीडा सचिव आणि ऑलिम्पिक हॉकीपटू जोकीम कार्व्हालो, संयुक्त सचिव आणि ऑलिम्पिक हॉकीपटू मर्विन फर्नांडिस, महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे उपाध्यक्ष धनंजय साठे, मानद सचिव अरुण केदार आणि मुंबई उपनगर जिल्हा कॅरम संघटनेचे कार्याध्यक्ष संतोष चव्हाण यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या उत्तम आयोजनाबद्दल दीपक नेटो आणि मर्विन फर्नांडिस यांनी महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे कौतुक केले.

गुरनूर ब्रारला आयसीसीने ठोठावला दंड



| ॲडलेड | वृत्तसंस्था |

न्यूझीलंडविरुद्धच्या चौथ्या एकदिवसीय सामन्यात आक्रमक सेलिब्रेशन करणे भारताचा युवा वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार याला चांगलेच महागात पडले. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी ब्रारला अधिकृत ताकीद देण्यात आली असून, त्याच्या खात्यात एक डिमेरिट गुणही जमा करण्यात आला आहे.

ब्रारने न्यूझीलंडचा फलंदाज टिम सायफर्ट याला बाद केल्यानंतर अत्यंत आक्रमक पद्धतीने सेलीब्रेशन केले. ब्रारची ही कृती फलंदाजाचा अपमान करणारी आणि त्याला प्रत्युत्तर देण्यास प्रवृत्त करणारी असल्याचे पंचांच्या लक्षात आले. याप्रकरणी ब्रारला आयसीसी आचारसंहितेच्या कलम २.५ अंतर्गत लेव्हल-१ चा दोषी ठरवण्यात आले.मैदानावरील पंच ख्रिस ब्राउन आणि कुमार धर्मसेना, तिसरे पंच पॉल रायफल आणि चौथे पंच वेन नाइट्स यांनी ब्रारवर हा आरोप ठेवला. ब्रारने आपली चूक मान्य केली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)